मासिक वार्तापत्र • अंक 9 • जुलै 2018 • सहयोग मूल्य - रु. 5 • 12 पाने

कामगार
# बिगुल
नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक



सूरत चा कापड उद्योग की कामगारांचा कत्तलखाना? 3

तुमच्या जाती-पातीचा ऱ्हास 6

देश श्रीमंतांच्या टॅक्सच्या पैशांवर चालतो का? 12

## मोदी सरकारची चार वर्षे : अच्छे दिनाचे स्वप्न दाखवून लूट करण्याचा नवा उच्चांक

# द्वेषाच्या चादरीखाली अपयश झाकण्याचा अपयशी प्रयत्न

चार वर्षांपूर्वी 16 मे रोजी मोठमोठ्या गप्पा ठोकत, लंबे-चवडे वायदे करत बहुमत मिळवून निवडून आलेले मोदी सरकार, केलेले कुठलेही वायदे पुरे करण्यात अगदीच अपयशी झाले आहे. वाढती महागाई, गुन्हेगारी आणि असुरक्षितेने त्रस्त जनतेच्या असंतोषाला पारावार उरला नाही. केंद्र व राज्यातील भाजप सरकारांची कामगारांच्या उरल्या सुरल्या कायदेशीर अधिकारांना संपवण्याची घोडदौड जोरात सुरु आहे. मंदी आणि महागाईने झोडपून निघत असणाऱ्या कामगारांमध्ये संताप खदखदत आहे. बेरोजगारीने उध्वस्त झालेले तरुण दर दिवशी रस्त्यावर सत्तेशी झुंजताना दिसत आहेत; गरीब शेतकरी मृत्यू जवळ करताहेत आणि दलित, अल्पसंख्यांक आणि स्त्रियावर पाशवी अत्याचाराचे सगळे रेकॉर्ड तोडले गेलेत. बहुतेक इलेक्ट्रॉनिक चॅनेल्स आणि प्रसार माध्यमांवर काही थोड्या बड्या-भांडवलदार घराण्यांचा कब्जा आहे. आणि या विकाऊ माध्यमांद्वारे झाकण्या-लपवण्याचा लाख प्रयत्न करून देखील दर दिवशी नव-नवे घोटाळे समोर येण्यामुळे भाजपच्या खोट्या सदाचाराचे धोतर-“हाफ चड्डी”-निसटतेच आहे. नैतिकता आणि शुचितेचा दाखला देणाऱ्या या फासिस्टांचे सत्य रूप तेव्हा तर अधिकच उघडे झाले, जेव्हा सगळ्या देशाने यांना उन्नाव पासून कठूआ(जम्मू) पर्यंतच्या घटनेत बलात्काऱ्यांच्या बाजूने उभे राहिलेले पहिले. कहर म्हणजे या खोट्या देशभक्तांना निरागस मुलीच्या खुन्यांच्या-बलात्काऱ्यांच्या बचावासाठी तिरंगा घेऊन मोर्चा काढायला देखील लाज वाटली नाही.

**मोदी सरकारच्या चार वर्षांचे**

संपादक मंडळ

**‘कर्तृत्व’ एवढेच आहे की एका बाजूला देशी-विदेशी बड्या कंपन्यांना या देशातील संपत्ती दोन्ही हातांनी लुटण्याची खुली सूट दिली गेली आहे, तर दुसऱ्या बाजूला कामगार-कर्मचाऱ्यांचे उरले-सुरले अधिकारही हिसकावून त्यांना पूर्णतः बड्या थैलीशहांच्या रक्तपिपासू लालसेच्या हवाली करण्याचा बंदोबस्त केला जात आहे.** कामगार बिगुलच्या मागील अंकात आम्ही अशा अनेक कामगार-विरोधी धोरणांबाबत चर्चा केली आहेच. निवडणुकी दरम्यान मोदीने दर वर्षी दोन करोड युवकांना रोजगार देण्याचा वायदा केला होता, पण चार वर्षे होवून देखील सरकारी आकड्यांनुसार रोजगार वाढण्या ऐवजी कमी झाले आहेत. प्रत्येकाच्या खात्यात 15 लाख जमा करण्याची बात तर जणू या शतकातला मोठा विनोद ठरला आहे. **‘न खाऊंगा, ना खाने दुंगा’चा दावा करणाऱ्या चौकीदाराच्या नाकाखाली सरकारी बँकांचे लाख करोड रुपये बुडवून कैक बडे उद्योगपती फरार झाले आहेत. चौकीदार मात्र लोकांना भ्रमात ठेवण्यासाठी जमिनीवर काठी आपटत आहे.** अर्थमंत्रालय आणि प्रधानमंत्री कार्यालयात गेलेल्या अनेक तक्रारींनंतरही हे बँकेचे घोटाळे होतच राहिले. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या नुकत्याच आलेल्या अहवालानुसार भारतातील रोजगाराच्या संधीत सातत्याने घट झाली आहे आणि जे अस्थायी रोजगार आहेत तिथे कामगारांची स्थिती अतिशय दयनीय आहे व पुढच्या एक वर्षापर्यंत सुद्धा स्थिती अशीच कायम राहील. जागतिक बँकेच्या एका अहवालात म्हटले आहे कि देशातील कामगार त्यांना हव्या असणाऱ्या मुलभूत सुविधांनाही मुकले आहेत, ते मोठ्या

पान 5 वर

## जगात सर्वात जास्त बेरोजगारांचा देश बनला भारत

### श्रम खात्याच्या आकड्यांनी खोलली सरकारी दाव्यांची पोल

## सतत रोजगार कमी होत आहेत आणि स्व-रोजगाराच्या संधीही घटत आहेत

✍ *सत्यप्रकाश*

श्रम खात्याने घोषित केलेल्या आकड्यांनी मोदी सरकारच्या मोठ-मोठ्या दाव्यांची पोल खोलली आहे आणि ते सत्य आकड्यांच्या स्वरूपात आपल्या समोर ठेवले आहे ज्याला सामान्य लोक स्वतःच्या अनुभवाने समजावून घेत होते. **भारताला सर्वात जास्त बेरोजगारांचा देश होण्याचा 'मान' प्राप्त झाला आहे. सर्वसमावेशक विकास निर्देशांकामध्ये भारत साठाव्या स्थानावर पोहचला आहे, म्हणजे शेजारील देशांपेक्षाही खूप खाली.**

आकडे सांगतात की देशात रोजगार सतत कमी होत आहेत आणि स्व-रोजगाराच्या संधी सुद्धा घटत आहेत. सामाजिक आर्थिक असमानता वाढत आहे. भारतीय अर्थव्यवस्था जगात सर्वात वेगानं वाढत आहे हे देशात होणाऱ्या विकासाचे दुसरे अंग आहे. 'बिजनेस एक्सेसीबीलिटी इंडेक्स' म्हणजे व्यवसाय करतानाच्या सुविधांमध्ये भारत 30 पायऱ्या वर चढला आहे.

**खरं तर देशात जसजसा विकास होत आहे तसतशी असमानता गगनाला भिडत आहे. श्रीमंत आणि गरिबांमधील दरी वाढत आहे.** स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाच्या नव्या सत्ताधाऱ्यांनी विकासाचा जो मार्ग निवडला होता त्यावर चालताना समाज याच दिशेनं पुढं जात होता. परंतु मागच्या तीन दशकांपासून लागू असलेल्या खाजगीकरण व उदारीकरणाच्या नीतीने हा वेग खूप वाढवला आहे. देशातील सर्व संसाधने मुठभर लोकांच्या हातात एकवटत आहेत. या परिस्थितीत देशात संपत्ती निर्माण होण्याचा वेग वाढला आहे. बहुराष्ट्रीय वित्तीय सेवा कंपनी 'क्रेडिट सुईस ग्लोबल'च्या अहवालानुसार वर्ष 2000 पासून भारतात उपस्थित संसाधनांचे संपूर्ण मूल्य प्रत्येक वर्षी 9.9 टक्के दराने वाढत आहे. ज्या लोकांच्या श्रमाच्या जोरावर ही संपत्ती निर्माण होत आहे ते मात्र या पासून पूर्णपणे वंचित आहे.

वृत्त संस्था ए.एन.आई नुसार देशात सार्वजनिक संसाधनांच्या वितारणामध्ये असमानता खूप वाढली आहे आणि लोकसंख्येचा एक तृतीयांश हिस्सा अजूनही गरिबी रेषेच्या खाली जगत आहे. परिस्थिती तर अशी आहे की 2017 च्या जागतिक भूक निर्देशांकात भारताचे स्थान घसरून 100 वर पोहचले आहे (2016 मध्ये आपण 97 व्या स्थानावर होतो). बांगलादेश,श्रीलंका,म्यानमार आणि आफ्रिकेतले काही देशही या निर्देशांकात आपल्या पेक्ष्या चांगल्या स्थानावर आहेत.

'ऑक्सफॅम'चा अहवाल 'वाढते अंतर': 'भारत असमानता अहवाल 2018' नुसार **जागतिक स्तरावर फक्त 1 टक्के लोकांच्या हातात जगाच्या एकूण संपत्तीचा 50 टक्के भाग आहे. भारतात 1 टक्के लोकांच्या हाती देशाची 58 टक्के संपत्ती आहे** (काही अहवालानुसार या पेक्षाही जास्त आहे) आणि 57 अब्जपतींकडे देशाच्या 70 टक्के जनतेकडे असलेल्या एकूण संपत्ती एवढी संपत्ती आहे.

लोकसंख्येच्या दृष्टीने भारत जगात दुसरा सर्वात मोठा देश आहे. देशाच्या 65 टक्के लोकसंख्येचे सरासरी वय 35 वर्षापेक्षा कमी आहे. कोणत्याही समाजासाठी एवढी मोठी तरुण लोकसंख्या खूप मोठी ताकद असते. परंतु भारतात या लोकसंख्येचा एक मोठा हिस्सा बेरोजगार आहे. आर्थिक सहयोग आणि विकास संघटनेच्या

पान 8 वर

# भारत असो किंवा सिंगापूर: कामगारांचे शोषण सगळीकडे सारखेच!

***'मजदूर बिगुल' या हिंदी पत्रकाच्या वाचक बिंदर कौर यांनी आम्हाला हे पत्र पाठवलं आहे. बिंदर कौर सिंगापूर मधे एका घरी घरकाम करतात. 'मजदूर बिगुल'च्या त्या नियमित वाचक आहेत. शिक्षित असलेले असे बरेच कामगार आहेत जे वेगवेगळ्या जागी आज अतिशय कमी मजुरीवर काम करतात व ते राजकीयदृष्ट्या सजग आहेत. ते बिगुलला वेळोवेळी पत्र लिहून किंवा फोन करून त्यांचे विचार मांडतात. इतर कामगार वाचकांना सुद्धा आम्ही हे आवाहन करतो की त्यांनी सुद्धा त्यांच्या आयुष्यातील अनुभवाविषयी बिगुलला पत्र लिहावे जेणेकरून देशातील सर्व कामगारांना हे कळेल की त्यांच्या समस्या आणि मागण्या एकच आहेत, भलेही त्यांची जात-धर्म-देश काहीही असो. बिंदर कौर यांचे हे पत्र आम्ही इथे कुठल्याही संपादनाशिवाय देत आहोत.***

कोणी म्हणतात इंग्रजीत मेड
कोणी म्हणतं हेल्पर
कोणी वर्कर तर कोणी मोलकरीण
तुम्ही लोक आम्हाला फक्त नाव देता
आमच्या घरातील परिस्थिती काय आहे
हे तुम्हाला नाही माहीत
आमच्या भाषेत इथे राहण्याला फक्त
मजबूरी हेच नाव आहे

माझे नाव बिंदर कौर आहे आणि वय 25 वर्षे. मी पंजाबची राहणारी आहे. भारतात माझ्यासाठी काही काम नव्हते म्हणून मी सिंगापूर ला काम करायला आली. घरातील सर्व काम, जेवण बनवणे इत्यादी काम मी करते.

22 सप्टेंबर 2017 ला मी सिंगापूरला आले. मी जसजसे इतर मुलींना भेटत गेले तसतसे त्या कशा परिस्थितीत राहतात, त्यांना काय काय सहन कराव लागतं हे माहीत पडायला लागलं. इथे छोट्या छोट्या गोष्टींवर भांडणे, शिव्या सहन करणे, अर्धपोटी उपाशी राहणे, घरात कैद राहणे आणि नेहमी भीतीखाली दबून राहणे हे त्यांना रोजचंच झालं होतं.

एक दिवस जेव्हा मी एजन्सी मधे गेले तेव्हा मी बघितलं की एक मुलगी घरातून पळून आलेली आहे. तिला विचारल्यावर माहीत पडलं की ज्या घरी ती काम करायची त्या घरचे लोक तिला खूप त्रास द्यायचे. जेव्हा ते घरी असायचे तेव्हा तिच्याकडून काम करून घ्यायचे, जेव्हा घरातून बाहेर पडायचे तेव्हा तिला बांधून ठेवायचे. इथपर्यंत की तिच्याकडून काही चूक झाली तर तिला थापड किंवा जोड्याने मारायचे, केस पकडून पण मारायचे. तिचं बाहेर जाणं येणं बंद होतं आणि तिचा फोन पण तोडून टाकला होता. जेव्हा एक दिवस ते लोक तिला बांधून गेले नाही तेव्हा खिडकीतून ती घराबाहेर पळाली. तिचा पासपोर्ट सुद्धा तिच्याजवळ नव्हता.

रविवारी सर्वांना सुट्टी असते. आम्ही रविवारची सुट्टी घेतल्यामुळे खूप साऱ्या मुलींसोबत बोलण्याची संधी मिळाली. त्यातील एका मुलीने सांगितले की तिच्याकडून दिवसातून तीन तीन वेळा घर साफ करून घेतल्या जातं.

दुसऱ्या एका मुलीने सांगितलं की एकदा तिच्याकडून चुकीने कपडा जळाला तर तिच्या मालकिणीने तिच्या पाठीवर इस्त्री लावली. एजन्सी मधे आणखी एक मुलगी भेटली तिचं नाव मनजिंदर होत व ती पंजाब मधील जालंधर शहराची राहणारी होती. ती एमए पास होती. ती खेळायची, खेळामध्ये पण तिने गोल्ड मेडल मिळवलेलं होत. नाईलाजानं तिला सिंगापूरला यावं लागलं. तिने सांगितलं की दीदी हे लोक मला नेहमी शिव्या देऊन बोलतात. काही चूक झाली तर म्हणतात 'अशिक्षित, गावंढळ कुठली. कुठून आले आहे कोण जाणे'. पूर्ण दिवस एक काम 2-2 किंवा 3-3 वेळा करून घेतात. सुट्टी चे पैसे पण देत नाहीत. सहा महिने झाले एक सुद्धा सुट्टी दिली नाही. बाहेर जाताना लॉक करून जातात.

नक्कीच सुंदर असतील
दगड व काचांच्या इमारती
परंतु बंद आहेत इथे
आई, बहिणी व मुली
आणि बंद आहेत त्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने

**तुमची साथी**
**बिंदर कौर,**
**सिंगापूर**

*(अनुवाद : जयवर्धन)*

## जपानी कवयत्री ओसानो अकिको यांची कविता

**दिवस येत आहेत**
**पर्वत हटवण्याचे**
**असे म्हणते मी,**
**संशय येतो इतरांना**
**वर्षानुवर्ष पर्वत**
**आहेत झोपलेले फक्त**
**भूतकाळात**
**आगीतून चालत**
**पुढे गेल्या होत्या बाया**
**आणि तरीही तुम्हाला**
**नसेल विश्वास तर**
**झोपलेल्या सर्व बाया जाग्या होतील**
**आणि आता पुढे येतील**



**'कामगार बिगुल' ची वेबसाइट**
**www.marathi.mazdoorbigul.net**
**फेसबुक पेज**
**www.facebook.com/kamgarbigul**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**

सहकाऱ्यांनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.

• रूम नंबर 104, हीरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. नं. 9619039793, 9145332849
• अहमदनगर - 9156323976, 9657590491
• पुणे - 9422308125

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | सोमनाथ केंजळे, सत्यनारायण |
| संपादकीय कार्यालय | : | रूम नंबर 204, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 9156323976, 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |


# "गुजरात मॉडल" चा खूनी चेहरा: सूरत चा कापड उद्योग की कामगारांचा कत्तलखाना?

*मजदूर बिगुल प्रतिनिधी*

गुजरातेतील सुरत शहर हे कापड उद्योगाचे मोठे केंद्र असून येथे हजारोंच्या संख्येने मजूर काम करतात. देशभरातील इतर औद्योगिक क्षेत्रांप्रमाणेच येथेसुद्धा मजूर लोक भयानक असुरक्षित परिस्थितीत काम करतात. अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका शोध अभ्यासात सुरत मधील कापड उद्योगात 2012 ते 2015 या सालात झालेल्या 84 घातक दुर्घटनांचा विस्तृत लेखाजोखा दिलेला दिलेला आहे ज्यामधे कमीत कमी कमी 114 कामगारांचा मृत्यू झालेला आहे. औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालय कडून आरटीआय मार्फत मिळालेल्या माहितीनुसार त्या कालावधीदरम्यान 375 पेक्षा अधिक कामगारांना गंभीर स्वरूपाच्या इजा झाल्यात. रिपोर्टनुसार बऱ्याच कारखान्यांमध्ये ईएसआय (एम्प्लॉयमेंट स्टेट इन्शुरन्स) योजना योग्य स्वरूपात लागू केल्या जात नाही त्यामुळे खूप सारे विमा असलेले कामगार अपंग असून सुद्धा हक्काच्या सहाय्या पासून वंचित राहतात. बरेच सारे कामगार तर ईएसआई सुविधेपासुनच वंचित आहेत

गुजरातच्या अलंग बंदर बाबत आता बऱ्याच लोकांना माहित आहे की तिथे जुन्या जहाजांना तोडण्याचे काम करणारे कामगार नेहमी दुर्घटना आणि बिमाऱ्यांना बळी पडतात. "सुरत मधील कापड उद्योगात कामगारांची परिस्थिती" या शिर्षका खाली आता प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टमुळे गुजरातेतील एका आणखी प्रमुख उद्योगाचा भयानक चेहरा समोर येत आहे. वडोदरा स्थित 'पीपल्स ट्रेनिंग अँड रिसर्च सेन्टर' चे जगदीश पटेल यांनी तयार केलेली ही रिपोर्ट सांगते की ही आकडेवारी पूर्ण वास्तव सांगण्यास असमर्थ आहे कारण खूप सारे कारखाण्यांची तर नोंदणीच नाही आणि त्यामुळे त्याची आकडेवारी सरकारी विभागाजवळ नाही. ह्या संस्थेने वृत्तपत्रांच्या कात्रणांची पडताळणी करून दाखवून दिले की सुरत मध्ये कापड उद्योगात 2012 ते 15 दरम्यान 121 कामगारांचा मृत्यू झाला व 126 कामगार गंभीर स्वरूपात जखमी झाले. परंतु रिपोर्ट हे पण सांगते की कारखान्यात कामावर झालेल्या सगळ्याच अपघातांची व मृत्यूची दखल वृत्तपत्रे घेत नाहीत व ते जनतेपर्यंत पोहोचत नाहीत कारण बरेच कारखाने नोंदणी झालेले नाहीत आणि तिथे काम करणाऱ्या कामगारांचा काही लेखाजोखा नाही.

ही काही नवीन बाब नाही. कुठल्याही क्षेत्रात काम करणारा कामगार किंवा कामगार कार्यकर्ता ही बाब जाणतो. काही वर्षांआधी दिल्लीच्या बादली औद्योगिक क्षेत्रात बिगुल कामगार दस्ता द्वारे आरटीआय अंतर्गत उद्योग विभाग, श्रम विभाग आणि दिल्ली पोलीस यांना ही माहिती मागितली की मागील तीन महिन्यात येथल्या कारखान्यात किती दुर्घटना झाल्या आणि त्यात जखमी व मृत्यू झालेल्या कामगारांची संख्या किती आहे. उद्योग विभाग आणि श्रम विभागा जवळ कुठलीही माहिती उपलब्ध नव्हती. दिल्ली पोलिसांनी सांगितले की त्या कालावधीत कुठल्याही कामगाराचा मृत्यू झालेला नाही आणि चार कामगार जखमी झाले. मजदूर दस्ताने स्वतः तीन महिन्यात कमीत कमी सहा कामगारांचा मृत्यू नाव व पत्या सहीत नोंदवला होता.



विजय प्रधान, वय 45, सुरतमधील सिंथेटिक कापड उद्योगातील 12 यंत्रमागांवर काम करताना. फोटो श्रेय: थॉमसन रुटर्स

रिपोर्ट सांगते की वर्ष प्रतिवर्षी अशा मोठ्या दुर्घटना होत राहतात तरीसुद्धा सरकारी विभाग याकडे पूर्णपणे डोळेझाक करीत आहे. रिपोर्ट नुसार सुरत मध्ये 1991-95 सालात 100 घातक दुर्घटना घडल्या. नंतर 2007 आणि 2008 मध्ये क्रमशा 40 आणि 36 दुर्घटनांची नोंद झाली परंतु त्यावर प्रतिबंध घालण्यासाठी कुठलाही ठोस उपाय केला गेला नाही. उलट नियम-कायदे धाब्यावर बसवून काम करणाऱ्या कारखान्यांची संख्या वाढत गेली आहे.

रिपोर्ट नुसार ही आकडेवारी सुरतच्या कापड उद्योगांमधील कामांतर्गत आरोग्य व सुरक्षेची परिस्थिती खूप चिंताजनक असल्याचे आपल्याला दाखवून देते. दुर्घटनांच्या कारणांवरून नजर टाकली तर 2012 व 15 च्या दरम्यान झालेल्या 121 घातक दुर्घटनांपैकी 30 जळण्याच्या कारणामुळे झाल्यात आणि 27 दुर्घटना विजेचा करंट लागल्यामुळे झाल्या. 23 दुर्घटनांचे कारण 'दोन पृष्ठभागांमध्ये दबल्यामुळे' असे सांगितले गेले. कारखान्यांच्या आतील परिस्थितीचा जाणकार कोणीही व्यक्ती याचा अर्थ समजू शकतो. याव्यतिरिक्त बरेच मृत्यू श्वास कोंडणे, उंचावरून पडणे, आग व विस्फोट, मशीन मध्ये फसणे, गॅस इत्यादी कारणांमुळे झालेत. बऱ्याच दुर्घटना जिवावर बेततात याचे कारण कारखान्याच्या परिस्थितीशी संबंधित आहे. रिपोर्ट मध्ये दिलेल्या एका उदाहरणावरून आपल्याला हे समजू शकते. सुरत येथील सूर्यफूल इंडस्ट्रियल इस्टेट मध्ये अश्विनीकुमार रोड वरील एका पावरलूम युनिट मध्ये 3 ऑक्टोबर 2015 रोजी 11:45 वाजता आग लागली. दुर्घटने दरम्यान बरेच कामगार बाहेर निघू शकले परंतु नीला नायक आणि कृष्णा लिम्जा नावाचे दोन कामगार दुसऱ्या मजल्यावर अडकले. फायर ब्रिगेड जोपर्यंत दोघांना बाहेर काढले तोपर्यंत महिला कामगाराची श्वास कोंडल्यामुळे मृत्यू झाला होता. रिपोर्ट सांगते "आग दुसऱ्या मजल्यावर सुरू होऊन तिसऱ्या मजल्यापर्यंत पोहोचली होती. मशीने अशा पद्धतीने ठेवल्या गेली होती की 2 मशिनांमध्ये अजिबात जागा उरलेली नव्हती आणि चालण्याचे रस्ते पूर्णपणे छोटे होते. रस्त्यातच कच्चामाल व तयार माल यांचे बंडल सुद्धा लावून ठेवण्यात आले होते. कारखान्यात 200 कामगार होते. तळमजल्यावरचे कामगार तर बाहेर पडू शकले परंतु दोन व तीन मजल्यावरचे कामगार अडकून पडले."

रिपोर्ट हे पण सांगते की बऱ्याच मामल्यांमध्ये मृतांच्या नातेवाईकांना किंवा जखमी झालेल्या कामगारांना एकतर भरपाई मिळत नाही किंवा मिळाली तरी फार कमी मिळते. रिपोर्टमध्ये अजय राजू यादव ( वय 18 वर्ष) याचे उदाहरण आहे ज्याच्यासोबत सुरत मधील एम्ब्रॉयडरी युनिट मध्ये काम करताना दुर्घटना झाली. मशीन मध्ये कपडे लावताना प्रेस मशीन च्या रोल मध्ये त्याचा डावा हात फसला व त्याची तीन बोटे कापली व एक बोट निकामी झाले. रिपोर्ट सांगते की वैद्यकीय विशेषज्ञांनी त्याचे अपंगत्व 47टक्के सांगितले परंतु त्याला काहीही भरपाई मिळाली नाही. युनिट इएसआई कायद्यांतर्गत नोंदणी झालेले होते परंतु त्या कामगाराला इएसआय कार्डच दिल्या गेले नव्हते. एका कामगार संघटनेकडून दोन वर्षे चालवलेल्या कानूनी कारवाईनंतर स्थानिक कोर्टाने अजयला 2 लाख 88 हजार 685 रुपये भरपाई आणि 86,625 रुपये दंड भरपाई देण्याचा आदेश दिला. मालकाने त्या कामगाराला कामावरून काढून टाकले. मागील पाच वर्षापासून त्या मामल्याची सुनवाई अजूनही चालूच आहे आणि अजयला एक पैशाची पण भरपाई मिळाली नाही. सुरत मधील कामगार वस्त्यांमध्ये तुम्हाला अशा बऱ्याच घटनांबद्दल ऐकायला मिळेल.

*अनुवाद : जयवर्धन*

# चिंचवडमधील प्रीमियर कंपनीतील कामगारांचे आंदोलन चालूच

*कामगार बिगुल प्रतिनिधी*

पुणे-पिंपरी-चिंचवड महानगरातील प्रीमियर कंपनीतील कामगार तीन महिन्यापासून कंपनीच्या गेटवर पगार, पीएफ, आणि विम्यासाठी आंदोलन करत आहेत आहेत. कंपनीमध्ये जवळपास दोनशे दहा कायम कामगार काम करतात आणि हे सर्वच कामगार आंदोलन करत आहेत. रोज काम संपल्यावर कंपनीच्या गेटवर घंटानाद करून कामगार आपला रोष व्यक्त करत आहेत. यासंदर्भात कामगार बिगुलचे प्रतिनिधी कामगारांना भेटले असता त्यांनी आंदोलनाबद्दल माहिती दिली. अनेक वर्षांपासून विविध मार्गांनी कामगारांची पिळवणूक चालवली आहे. कंपनीने सात वर्षांपासून कंपनीने कामगारांच्या पीएफ चे आणि इन्शुरन्सचे पैसे भरले नाहीत. यामुळे अनेक कामगारांचा विमा सुद्धा रद्द झालेला आहे. जवळपास आठ महिन्यांपासून कंपनीने कामगारांचे पगार सुद्धा दिलेले दिलेले नाहीत. आठ-नऊ महिन्यांपासून पगार थकल्यामुळे कामगारांचे प्रचंड हाल होत असून, मुलांच्या शाळांच्या फी पासून ते घरभाडे थकल्यामुळे, दोन वेळचे खाणे सुद्धा मुश्किल झाले आहे. कामगारांच्या मते कमीतकमी जवळपास तेरा ते चौदा कोटी रुपये अशाप्रकारे कंपनीने बाकी ठेवलेले आहेत.

2017 मध्ये कंपनीने मुंबईतील जागा विकून 120 कोटी कमावले पण कामगारांचे देणे काही चुकते केले नाही. कंपनीची जमीन पुणे-पिंपरी महानगरातील अतिशय मोक्याच्या जागी असून कंपनी बंद करून ही जागा हजारो कोटी रुपयांना विकण्याचा कंपनीचा डाव आहे. त्यासाठी कामगारांना देशोधडीला लावावे लागले तरी कंपनीला पर्वा नाही. अशा खेळींद्वारे कामगारांवर दबाव आणून त्यांना कंपनी सोडायला भाग पडायचे आणि नंतर कंपनीच बंद करायची असा कंपनी मालकांचा डाव आहे. कंपनीच्या कारभाराविरोधात कामगारांनी कामगार आयुक्त आणि न्यायालयाकडे सुद्धा दाद मागितली. नोव्हेंबर 2017 मध्ये न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निर्णय देऊन सुद्धा कंपनी तो निर्णय लागू करण्यास तयार नाही. अशाप्रकारे कोर्टाचे सुद्धा ऐकायला कंपनी तयार नाही. या विरोधामध्ये जवळपास दोन महिन्यांपासून कामगार कंपनी गेटवर आंदोलन आंदोलन करत आहेत. मे 2018 च्या शेवटच्या आठवड्यात तर कंपनीने एक प्रकारे टाळेबंदीच लागू केली.

कामगारांच्या नेत्यांवर नशा करणे, गदारोळ घालणे असे खोटे आरोप लावून आंदोलनात फूट पाडण्याचा आणि नेत्यांना दडपण्याचा प्रयत्न कंपनीने चालवला आहे. कामगारांनी आंदोलन चालूच ठेवल्यावर, जून महिन्यात टाळेबंदी मागे घेतली, परंतु कामगारांच्या नेत्यांना कामावर घेण्यास कंपनी नकार देत आहे. कामगार नेत्यांनी घेराव घातला अशी तक्रार पोलिसांमध्ये मॅनेजमेंटने केली असून, या तक्रारीची प्रत सुद्धा कामगारांना दिली जात नाहिये. थकलेला पगार, पीएफ आणि इतर मागण्यांसाठी ही बातमी देईपर्यंत आंदोलन चालूच होते. या आंदोलनाला बिगुल मजदूर दस्ता आणि शहरातील विविध कामगार संघटना, नागरिक, संस्था व राजकीय पक्षांनी पाठिंबा दिला आहे.

प्रीमियर कंपनीच्या उदाहरणातून पुन्हा एकदा दिसून येते की कामगारांच्या श्रमातून निर्माण झालेला प्रत्येक पैसा घशात घालण्यासाठी मालक कोणत्याही थराला जाऊ शकतात. एका बाजूला कामगारांच्या श्रमशक्तीच्या पिळवणूकीतूनच नफा कमावतात, तर दुसरीकडे झालेल्या कामाचा पगार थांबवतांना सुद्धा धनाढ्य मालक थोडेही कचरत नाहीत. कामगार कायदे, न्यायालये, कामगार आयुक्त अशा सर्वांकडे दुर्लक्ष करून मालक आपलाच रेटा लावू शकतात, यातूनच दिसून येते की भांडवलशाही मध्ये खरी सत्ता मालकवर्गाचीच चालते. त्यामुळे या भांडवलशाहीला, खाजगी संपत्तीला नष्ट करण्यासाठीच कामगारांनी संघटीत झाले पाहिजे.

# दिल्लीतील शाहबाद डेअरी वस्तीतील कामगार वर्गाच्या जीवनाची नरकीय परिस्थिती

✍ *मजदूर बिगुल प्रतिनिधी*

प्रत्येक मोठ्या शहरात एक किंवा अधिक घाणेरड्या झोपडपट्ट्या आहेत, जेथे मजूर वर्ग खुराड्यात कोंबलेल आयुष्य खर्च करतो. हे खरं आहे की श्रीमंत राजवाड्यांच्या जवळपास नजरेत न येणारी गरिबी राहते पण बऱ्याचदा सुखसंपन्न वर्गाच्या नजरेदूर मजूर वर्गाला जागा दिली जाते जिथे ती आपसी वादात अडकून राहू शकतील. अशा घाणीचे साम्राज्य असणार्या झोपडपट्ट्या इंग्लंडमधल्या प्रत्येक शहरात जवळपास सारख्याच पद्धतशीर वसलेल्या आहेत- शहरातल्या सगळ्यात वाईट भागात निम्नस्तरीय वाईट घर, अनेकदा लांब रांगांमध्ये एक किंवा दोन मजली झोपडपट्ट्या, तळघर सुद्धा राहायला उपयोगात आणून, नेहमीच अस्ताव्यस्त बांधली गेलेली असतात. दोन किंवा तीन छोट्या खोल्या आणि एक स्वयंपाक खोली असणारी ही घरं लंडनचा काही भाग वगळता, सर्व इंग्लंडमधील कामगार वर्गाच्या सामान्य राहण्याचा मुक्काम आहे. कच्च्या खडकाळ ओबडधोबड गल्ल्या, घाणेरड्या आणि कचऱ्याने भरलेल्या असतात, इथे सीवर आणि नाले तर नसतात पण सडक्या वास मारणाऱ्या साचून थांबलेल्या पाण्याच्या गड्ड्यांची कमी नसते. याव्यतिरिक्त बांधणीच्या अस्ताव्यस्तते मुळे साफ खेळती हवा ही नसते. एका छोट्या हिश्शात खूप सारी माणसं खुराड्यात कोंबल्या गत आयुष्य जगतात त्यामुळे तिथल्या वातावरणाचा अंदाज बांधणे अवघड नाही. चांगल्या वातावरणात गल्ल्यांचा वापर सुकवण्याची जागा म्हणून होतो जिथे या घरापासून त्या घरापर्यंत गेलेले तार ओल्या कपड्यानि लादलेले असतात.

वरच्या ओळींमध्ये जर इंग्लंड चा उल्लेख वगळला तर दिल्लीतील शहाबाद डेअरी मध्ये जाणारा प्रत्येक व्यक्ती वरील विवरण तिथलच आहे हे सहज मान्य करू शकेल. परंतु वरील विवरण हे कामगारांचे महान शिक्षक आणि नेते फ्रेडरिक एंगल्स यांचं प्रसिद्ध पुस्तक 'इंग्लंडमधील कामगारवर्गाची दशा' मधून घेतलं गेलं आहे. हे पुस्तक एंगल्स ने आजपासून 175 वर्ष आधी लिहिलं. जवळजवळ सर्व देशांमध्ये भांडवलशाहीत उदय होऊन वाढणा-या मजुरांची परिस्थिती जवळजवळ सारखीच दयनीय राहिली आहे, फक्त वेळ वेगळी असू शकते. भारतासारख्या मागास भांडवलदार देशात, कामगार वर्गाची परिस्थिती आणखी जास्त वाईट आहे.

शाहबाद डेअरी ही दिल्लीच्या बाहेरील भागात स्थित एक झोपडपट्टी आहे, जेथे कामगारांची संख्या मोठी आहे. इथले कामगार जवळपासच्या औद्योगिक भागात जसे की शहाबाद डेअरी, बवाना, नरेला, बादली जहांगीर पुरी मध्ये काम करतात. वस्तीतील महिला कारखान्यांमध्ये काम करण्याव्यतिरिक्त जवळपासच्या मध्यमवर्गीय घरांमध्ये घरगुती कामगार म्हणून सुद्धा काम करतात. जसे भारतातील सगळ्याच कामगार वस्त्यांचे हाल आहेत तसेच शहाबाद डेअरीमध्ये सुद्धा मूलभूत सुविधा नसल्यात जमा आहेत. शहरात आपल्या कष्टाने झगमगाट ठेवणाऱ्या कामगार लोकसंख्येला अंधाऱ्या-खुराडांमध्ये जगायला भाग पाडल्या जाते.

शाहबाद डेअरीची सर्वात गरीब लोकसंख्या ही वस्तीच्या खालच्या भागात राहते जेथे मोठ्या तळी आणि खड्ड्यात पाणी सडत तुंबलेलं असतं त्यातून एक नाला निघतो. खड्ड्यांच्या चारी बाजुनी आणि नाल्याच्या दोन्ही बाजूला कामगारांनी जोडतोड करून वस्ती केलीये. पावसाळ्यात येथे काय परिस्थिती होत असेल याचा अंदाज सहज लावल्या जाऊ शकतो, नाल्यातील गलिच्छ पाणी सहजपणे घरामध्ये घुसतं, घरा बाहेर पडायला शक्य होत नाही आणि विविध प्रकारचे रोग पसरतात. हे लक्षात घेण्याजोग आहे की दिल्लीतील डेंग्यू रुग्णांची संख्या ज्या भागात सगळ्यात जास्त असतात त्यात शाहबाद डेअरी सुद्धा आहे.





शाहबाद डेअरी ची लोकसंख्या जवळपास एक लाख आहे, येथील लोकांना जवळ रिक्त निर्जन क्षेत्रात उघडयावर शौचाला जावं लागायचं कारण दोन वर्षांपूर्वी पर्यंत वस्तीत सार्वजनिक शौचालये नव्हती. महिला व मुलींना सहसा छळ करायला लागायचा आणि बलात्कार सारख्या भयानक घटना अतिशय सामान्य होत्या. शौचालय नसल्यामुळे परिस्थिती एवढी वाईट झाली होती की मातानी आपल्या मुलांना रात्री अन्न किंवा पाणी देणे बंद केलं जेणेकरून ते रात्री शौचाला जायला लागणार नाही. जेव्हा वस्तीतील कामगारांनी शौचालय बांधण्यासाठी नौजवान भारत सभेच्या नेतृत्वाखाली कडवा संघर्ष सुरु केला, तेव्हा सरकारने काही सार्वजनिक शौचालये बनवली परंतु ती परंतु ती एकूण लोकसंख्येसाठी फार कमी आहेत.

इथे 12 व्या वर्गापर्यंत फक्त एकच शासकीय शाळा होती, जी 2016 मध्ये शाळेत एका मुलाचा विजेचा झटका लागून मृत्यू झाला म्हणून बंद केल्या गेली. तेव्हापासून ती परत सुरु झाली नाही. ह्या शाळेतील मुले 3किमी पेक्षा जास्त अंतरावरील प्रह्लादपूर शाळेत बदली करून दिली गेली. यामुळे बऱ्याच मुलांची आणि विशेष करून मुलींची शाळाच सुटली. याशिवाय, तीन प्राथमिक शाळा आहेत, ज्याची स्थिती इतकी खराब आहे की येथील एका वर्गात 70-70, 80-80 मुले आहेत. तिथे ना पिण्याचे पाणी आहे ना स्वच्छ शौचालय. यामुळे सर्व मुले आणि विशेषतः मुलींना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.

पिण्याच्या पाण्याची समस्या आणखी भयावह आहे. येथे पाण्याची पाईपलाईन ठेवली गेली नाही, त्यामुळे टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविले जाते. पूर्ण लोकसंख्येच्या गरजेसाठी जेवढे टँकर यायला हवेत त्याचा निम्मेसुद्धा येत नाही. केजरीवाल सरकारच्या हवाई दाव्याबाबत सत्य आपल्याला येथे माहीत होते. निवडणुकीआधी केजरीवाल सरकारनी दिल्लीतील सर्व लोकांना 700 लिटर पाणी दररोज, जिथे पाईपलाईन नसेल तेथे पाईपलाईन देण्याचे आश्वासन दिले होते. वास्तव हे आहे की प्रत्येक घरात, लोकांनी 2-3 प्लास्टिकची 20-20 लीटरची जार ठेवली आहे आणि जेव्हा पाणी टँकर येतात तेव्हा ते या जारांमध्ये पाणी भरतात. हे लक्षात घेण्यासारखे आहे की दररोज टँकरनेदेखील पाणी पुरविले जात नाही, परंतु टँकर दोन दिवसात एकदाच येतो. ह्यातून दररोज फक्त 20 लीटर पिण्याचे पाणी सरकारकडून प्रत्येक घरात उपलब्ध करून दिले जात आहे हे स्पष्ट होते. यामुळे लोकांमध्ये उगवणाऱ्या प्रत्येक दिवशी आपापसात भांडण होतात. आत्ता काही दिवस आधी दिल्लीतील वजीरपुर कामगार वस्तीत एक वृद्ध आणि त्याचा मुलगा यांनी टँकरमधील पाणी वेळेच्या आधी काढल्यामुळे त्यांची भांडणांमध्ये हत्या झाली. आपल्याला मध्यमवर्गातील अनेक लोक मिळतील जे म्हणत असतात कामगार चिडखोर-भांडकुदळ असतातच, ते लहानसहान गोष्टींवरुन भांडण-वाद-मारामारी करायला तयारच असतात. परंतु जर ते त्यांच्या एसी घरांमधून बाहेर पडले आणि कामगारांच्या परिस्थितीचा आढावा घेतला तर त्यांना कळेल की ही नफेखोर भांडवली यंत्रणा कामगारांना अशी संघर्षमय जीवन जगण्यास प्रवृत्त करते ज्यात त्यांना पपाण्यासारख्या मूलभूत आवश्यकतांसाठी सुद्धा संघर्ष करावा लागतो. परंतु ज्या लोकांच्या घरी पाईपलाईनीतून पाणी येते आणि ते पाणी फक्त पिण्यासाठीच नाही तर त्यांची कार धुण्यासाठी, घरातील पाळीव कुत्र्याला आंघोळ घालण्यासाठी सुद्धा वापरतात त्यांच्याकडून परिस्थिती समजण्याची अपेक्षा केल्या जाऊ शकत नाही.

शेवटी कामगार वर्गाची परिस्थिती फक्त शहाबाद डेअरी वस्तीतच भयावह नाही तर पूर्ण भारतात सारखीच आहे. नफ्यावर आधारित मनुष्यभक्षी भांडवली व्यवस्थित यापेक्षा वेगळी काही अपेक्षा केल्याचं जाऊ शकत नाही.

*अनुवाद : डॉ. निखिल*

## भगतसिंह म्हणाले होते

समाजाचे प्रमुख अंग असूनही आज कामगारांना त्यांच्या प्राथमिक हक्कांपासून वंचित ठेवले जाते. शोषण करणारे भांडवलदार त्यांच्या निढळाच्या कमाईतून निर्माण होणारी सर्व संपत्ती हडपून टाकतात. दुसऱ्याचे अन्नदाते असणारे शेतकरी आज त्यांच्या कुटुंबासह एकेका दाण्यासाठी मोताद बनले आहेत. जगभरच्या बाजारपेठांसाठी कपडे उपलब्ध करून देणाऱ्या विणकऱ्याला आपले व पोराबाळांचे शरीर झाकण्याइतकेदेखील कापड मिळत नाही. सुंदर महाल निर्माण करणारे गवंडी, लोहार, सुतार स्वत: मात्र घाणेरड्या वस्त्यांत राहून आपली जीवनयात्रा समाप्त करतात. या विपरित समाजातील शोषक भांडवलदार त्यांच्या छोट्यामोठ्या लहरींखातर लाखो-कोट्यावधींची उधळपट्टी करतात.

ही भयानक विषमता आणि जबरदस्तीने लादला गेलेला भेदभाव जगाला एका महाभयंकर उलथापालथीकडे घेऊन जाणे अटळ आहे. ही स्थिती अधिक काळ टिकून राहणे शक्य नाही. आजचा धनिक समाज एका भयंकर ज्वालामुखीच्या तोंडावर बसून चैनबाजी करीत आहे, व शोषकांची निरागस मुले आणि कोट्यावधी शोषित माणसे एका उंच कड्यावरुन चालत आहेत, हे अगदी उघड आहे.

*बॉम्ब प्रकरणात सत्र न्यायालयात निवेदन*

# मोदी सरकारची चार वर्षे : अच्छे दिनाचे स्वप्न दाखवून लूट करण्याचा नवा उच्चांक

पान 1 वरून

मुश्कीलीनेच कुटुंब पोसू शकतील अशी अवस्था आहे. रोजगार गमावण्याच्या स्थितीत तर त्यांना अनेक तऱ्हेचा दबाव आणि अभावाचा सामना करावा लागतो. हे पहिलेच असे सरकार आहे कि ज्यांनी आपल्या सर्व उद्दिष्टांच्या पुर्तीची तारीख 2022 निश्चित केली आहे, म्हणजे 2019 च्या लोकसभा निवडणुकीदरम्यान त्यांच्यावर कुणी प्रश्न उपस्थित करणार नाही. पेट्रोल व डिझेल चे भाव जेव्हा आंतरराष्ट्रीय बाजारात सतत कमी होत आहेत, तेव्हा मोदी सरकार सेन्ट्रल एक्साईज ड्युटी वारंवार वाढवून सरकारी तिजोऱ्या भरण्याच्या कामाला जुपली आहे. आता जेव्हा कच्च्या तेलाच्या किंमती वाढत आहेत आणि पेट्रोल-डिझेलच्या किंमती आकाशाला गवसणी घालताहेत, तेव्हाही लिटर मागे जवळपास 8 रु. रोड आणि इन्फ्रा. सेस अजून लादला आहे. मोदी सरकार आणि त्याचा मालक संघ परिवार आता अगदी नग्नपणे आणि निलाजरेपणे पुन्हा त्याचा खरा खेळ म्हणजे द्वेषाचे राजकारण करण्यात जुपला आहे, जेणेकरून येऊ घातलेल्या निवडणुकीत त्याचा लाभ घेता येईल. ही द्वेषाची शेती पिकायला जनतेचे रक्त कमी पडू नये म्हणून म्हणून जागोजागी संघाच्या पिलावळी प्रशिक्षणाची शिबिरे लावून हिंदू तरुण आणि बालकांना मारामारी-कापाकापी करण्याचे ट्रेनिंगही देत आहे. रोजगार देणे, महागाई कमी करणे, गुन्हे रोखणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे या सारखे अनेक दावे हवेत विरून गेल्यानंतर त्यांच्याकडे आपला सदाचाराचा बुरखा उतरवून फेकून सरळ सरळ हिंसा आणि घृणेचा जुना खेळ खेळण्या वाचून दुसरा काही उपाय शिल्लक राहिलेला नाही. कर्नाटक निवडणुकी पूर्वीच याची अनेक उदाहरणे आपण पहिली आहेत. मध्यप्रदेशाच्या निवडणुकी पूर्वी तिथे पेटवल्या गेलेल्या द्वेषाच्या आगीत एका निर्दोष मुस्लिमाचा बळी गेला होता, ज्याला गोहत्येची अफवा पसरवून मारले गेले.

खरेतर 2014 ला भाजप सत्तेवर येण्यापासूनच समाजामध्ये विभाजन आणि इतिहासाच्या चक्राला उलटे फिरवण्याची सुरुवात झाली. पण या चार वर्षात मोदीचा मुखवटा एकदम नग्न होण्यातून आणि सरकार विरोधात चहुबाजूने वाढत्या असंतोषाच्या परिणामी आता हे काम ते अगदी राजरोसपणे करत आहेत. जर ते त्यांच्या प्रयत्नात यशस्वी झाले तर संपूर्ण देशाला रक्ताच्या दलदलीत बदलवण्याचा पुरेपूर प्रयत्न करतील. म्हणून सावध राहून, एकजूट राहून आणि लोकांमध्ये यांच्या दुष्ट मनसुब्याला उघड करण्याची गरज आहे.

फासीवाद वास्तवात सडू लागलेली भांडवलशाही असतो. भांडवलशाहीच्या वाढत्या आर्थिक संकटाच्या परिणामी संपूर्ण जगात या फासिस्ट शक्ती डोकं वर काढत आहेत. कारण संकटात सापडलेल्या भांडवलशाही पुढे त्यातून वाचण्याचा एकच मार्ग शिल्लक राहतो, आणि तो आहे जनतेचे अधिकाधिक शोषण करणे आणि आपला नफा कायम ठेवणे. त्यासाठी तिला अशा एका आंदोलनाची गरज असते जे सत्तेत बसून दंडुक्याच्या जोरावर कष्टकऱ्याच्या हाडे देखील पुऱ्या ताकदीनिशी पिळून काढेल आणि सोबतच समाजात आपसांत द्वेष पसरवत लोकांना अशा तऱ्हेने विभाजित करेल कि ते आपल्या बरबादी, उध्वस्तीकरणा बाबत विचारही करू शकणार नाहीत मग त्या विरुध्द लढायचे तर सोडाच. भारतात हेच तर होत आहे. मोदीच्या स्टार्टअप, स्टँडअप, मेक इन इंडिया सारख्या अनेको योजना आणि शेकडो करोड रुपये उडवून विदेशातल्या अंधाधुंद दौरे करूनही अर्थव्यवस्था बिलकुल ठप्प आहे. रोजगार निर्माण होत नाहीत कारण अगोदर लावलेले कारखानेच संपूर्ण ताकदीनिशी चालत नाहीत, नवे लावण्याचा तर प्रश्नच उभा राहत नाही. सरकारी नोकऱ्यांमध्ये टप्प्याटप्प्याने आणि गुपचूप कपात चालूच आहे, आता तर असे जाहीर केले आहे कि एका झटक्यात केंद्र सरकारचे साडेचार लाख पदे रद्द केली जातील. वेतन वाढत नाही, पण महागाई मात्र बेहिशोबी वाढत आहे. मनरेगा पासून तमाम कल्याणकारी योजनांमध्ये कपात करून या भांडवलदारांना मोठी सूट आणि भेट दिली जात आहे; शिक्षण, आरोग्य, घर सगळं सामान्य माणसाच्या आवाक्यातून निसटून जात आहे. कामगार, शेतकरी, कर्मचारी, विद्यार्थी, दलित, अल्पसंख्याक, आदिवासी, महिला सर्व बेहाल झाले आहेत आणि आवाज उठवला तर मारले-झोडले जाताहेत, दमनाचे बळी बनवले जाताहेत.

सध्याची परिस्थिती तर पहिल्या पेक्षा जास्तच बदललेली आहे. आज हिंदुत्ववादी कट्टरवाद्यांची ताकद खूप वाढली आहे. यांनी मोठ्या प्रमाणात वातावरण कधी नव्हे इतके अल्पसंख्यांक विरोधी द्वेषपूर्ण बनवले आहे. गोहत्या, धर्म परिवर्तन, लव-जिहाद, हिंदू धर्म रक्षा इ. सारख्या खोट्या घोषणाबाजीच्या जोरावर वातावरण अल्पसंख्यांक विरोधी बनवले जात आहे आणि विशेष करून मुस्लीम व ख्रिश्चनांना निशाणा बनवले जात आहे. दलितांवरील दमन-अत्याचारात प्रचंड वाढ झाली आहे. सांप्रदायिक फासिवाद्यांविरोधात आवाज उठवणारे साहित्यकार, सामाजिक कार्यकर्ता यांना जीवे मारण्याची धमकी दिली जात आहे, कित्येकांची तर हत्या झाली आहे.

लुटारू भांडवलदारांची सेवा करणाऱ्या हिटलर-मुसोलिनीच्या धर्तीवर फासिवादाची सत्ता कायम करुन जनतेच्या सर्व लोकशाही अधिकारांची हत्या करण्याचा मनसुबा बाळगणाऱ्या आर. एस. एस. ची सदस्य संख्या गेल्या पाच वर्षात वेगाने वाढली आहे. ऑगस्ट 2015 च्या एका अहवालानुसार मागील पाच वर्षात देशाच्या काना कोपऱ्यात लागणाऱ्या शाखांची संख्या 61 टक्क्यांनी वाढली आहे. देशात रोज 51,335 शाखा रोज चालतात. आर. एस. एस शी संबधित जवळ जवळ 40 संगठनांचा आधार वेगाने वाढला आहे. मोदी सरकार सत्तेवर येण्यामुळे संघ व त्याच्या पिलावळींचा प्रसार अजून जोरात झाला आहे आणि सैन्य, पोलीस, नोकरशाहीपासून ते न्यायालये आणि निवडणूक आयोगासहित राज्यतंत्राच्या शिक्षण संस्था इ. मध्ये त्यांची घुसखोरी अतोनात वाढली आहे. हे सर्व होत आहे देशातील भांडवलदारांच्या समर्थनानेच.

संघ परिवाराच्या वाढत्या ताकदी सोबत सांप्रदायिक हिंसेच्या घटनांमध्ये तीव्र वाढ झाली आहे. संघ परिवारच नव्हे तर सरळ वा परोक्ष रीतीने जोडलेल्या अनेक हिंदुत्ववादी कट्टरपंथी संघटना सांप्रदायिक द्वेष पसरवण्याचे काम करत आहेत व हिंसेच्या घटनांना मूर्त रूप देत आहेत. विविध पार्ट्यांची सरकारे व पोलीस प्रशासनही यांच्या विरोधात कारवाई करण्याऐवजी त्याची पाठराखण करताहेत. भाजपचे केंद्र व राज्यातील सरकार या हिंदुत्ववादी कट्टरपंथींना हवा देत आहेत. गेल्या चार वर्षात पाशवी सांप्रदायिक हिंसेच्या बहुतेक प्रकरणात दोषींना सजा झाली नाही, उलट त्यांना वाचवण्याचाच प्रयत्न झालाय. अनेक केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, खासदार, आमदारांकडून मुस्लीम विरोधी चिथावणीखोर विधाने सातत्याने येत राहिली आहेत, पण त्याच्यावरही कुठल्याच स्वरूपाची कारवाई झाली नाही. अशा घटनांवर नरेंद्र मोदींचे सरकार मूग गिळून गप्प बसते आणि कधी कधी दिलेल्या गोल-मोल वक्तव्यातून हिंदुत्ववादी कट्टरतावाद्यांना स्पष्ट संदेश जातो कि त्यांनी त्यांच्या ह्या काळ्या कारवाया वाजत-गाजत चालू ठेवाव्यात, त्यांच्या विरोधात कारवाई करण्याचा सरकारचा काहीएक इरादा नाहीये.

आपल्याला हे विसरून चालणार नाही की आज जे लोक देशभक्ती आणि राष्ट्रभक्तीचे ठेकेदार असण्याचा टेंभा मिरवताहेत त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात अजिबात भाग घेतला नव्हता. ही तीच माणसे आहेत ज्यांनी अनेक स्वातंत्र्यप्रेमी क्रांतिकारकां विरोधात खबरी दिल्या होत्या. सत्ताधारी पक्ष आणि संघ परिवार ही अशा लोकांची गर्दी आहे जी आज देशाचे धर्म जातीच्या नावाने तुकडे पाडत आहे, आणि सांप्रदायिकतेच्या लाटेवर स्वार होत आज सत्तेवर पोहचली आहे. यांनी देशभक्तीला सरकारभक्तीशी जोडले आहे. जो कोणी सरकार पेक्षा वेगळा विचार करतो, त्याच्या धोरणांवर टीका करतो, हक्कांसाठी आवाज बुलंद करतो, त्याला लगेचच देशद्रोही घोषित केले जाते. अंबानी आणि अदानीसारख्या उद्योगपतींच्या तुकड्यावर पोसला जाणारा कॉर्पोरेट मीडिया सुद्धा या कथित देशभक्तीच्या सुरात सूर मिसळवतो आणि आपल्या स्टुडीओ मध्येच खटला भरवून निर्णय देवून टाकतो.

नकली देशभक्तीच्या कोलाहालात सामान्य कष्टकरी जनतेच्या जगण्याचे जिव्हाळ्याचे मुद्दे झाकण्याचा प्रयत्न केला जातो आहे. डाळ, भाजी, औषधे, तेल, गॅस, घर भाडे, अशा प्रत्येक गोष्टीत आकाशाला भिडणाऱ्या महागाईने गरीब तथा निम्न मध्यम वर्गाचे पार कंबरडे मोडले आहे. विकासाच्या लंब्या-चवड्या दाव्यांच्या पूर्तीची गोष्ट तर दूरच, उलट गेल्या चार वर्षात खाण्या-पिण्याच्या, औषध-पाण्याच्या, शिक्षणासारख्या मुलभूत गोष्टी मात्र बक्कळ महाग झाल्यात. दुसरीकडे मनरेगा व विभिन्न कल्याणकारी योजनामध्ये मोठ्या प्रमाणात कपात केली गेली आहे, तर अंबानी, अदानी, बिर्ला, टाटा सारख्या मालकांना मोदी सरकार तोहफ्यावर तोहफे देत आहे. अनेक करांवर सवलत, मोफत वीज, पाणी, जमीन, विना व्याज कर्ज आणि कामगारांना मनसोक्त लुटण्याची मुभा दिली जात आहे. देशाची नैसर्गिक साधन-संपत्ती आणि जनतेच्या पैश्यातून उभारलेले उद्योग, कवडी मोल किंमतीत त्यांच्या हवाली केले जात आहेत. 'स्वदेशी', 'देशभक्ती', 'राष्ट्रवाद' इ. चा ढोल वाजवत सत्तेवर आलेल्या मोदीने सरकार बनताच विमा, संरक्षणासारख्या महत्वाच्या क्षेत्रांमध्ये थेट परकिय गुंतवणूक करण्याची परवानगी दिली. 'मेक इन इंडिया'च्या गवगव्याचा अर्थ एवढाच आहे कि 'या.. !, दुनियाभरातल्या मालक, भांडवलदार आणि व्यापाऱ्यानो या. या आणि आमच्या देशातील स्वस्त श्रम आणि साधन-संपत्तीची बिनधास्त लूट करा.'

जर आज आपण या हिटलरच्या अनुयायांचा खरा चेहरा ओळखला नाही व यांच्या विरोधात आवाज उठवला नाही तर उद्या खूप उशीर झाला असेल. प्रत्येकाच्या जिभेला कुलूप लावलेले असेल. देशातल्या वाढत्या महागाई, बेरोजगारी आणि गरिबीची स्थिती अशी आहे कि यात पिचलेल्या प्रत्येकाला त्याच्या हक्कासाठी लढावेच लागेल. अशात हे सरकार आणि त्यांच्या गुंड संघटना हर एकाला देशद्रोही घोषित करतील. आपण यांचा खरा चेहरा जनते समोर आणायला हवा. शहरातील चाळींमध्ये, वस्तीपासून ते कॉलेज कँपस आणि शैक्षणिक संस्थामध्येही आपण यांचे मुखवटे ओरबाडून उघडे पाडायला हवेत. गावागावात, वाड्या-पाड्यांवर यांची पोल खोल करायला हवी.

फासिस्तां विरोधी जोरदार प्रचार आणि या संघर्षात कष्टकरी जनतेच्या तरुणांची भरती करण्या सोबतच आपण हेही ध्यानात ठेवायला हव कि फासिस्त ताकदींनी आज राज्यसत्तेवर नियंत्रण मिळवण्या सोबतच समाजात विभिन्न रूपात बस्तान बसववून ठेवलं आहे. यांच्याशी मुकाबला करायचा असेल तर पर्यायी शिक्षण, प्रचार आणि संस्कृतीचे आपले तंत्र विकसित करावे लागतील, कामगार वर्गाला राजकीय स्तरावर शिक्षित आणि संघटीत करावे लागेल, आणि मध्यम वर्गातील रॅडीकल घटकांना त्यांच्या सोबतीने उभे करावे लागेल. संघटीत क्रांतिकारी केडर शक्तीने आपल्यालाही आपली खंदके खोदून आणि बंकर बनवून भांडवल आणि श्रम यांच्यात चालू असलेल्या दीर्घ वर्गयुद्धात भांडवलाचे भाडोती गुंड असणाऱ्या फासीवाद्यां विरोधात पवित्रा घ्यावा लागेल.

---

**त्यांची भीती**
जेव्हा आम्ही गातो, ते भयभीत होतात.
ते घाबरून जातात जेव्हा आम्ही मूक होतो.
ते घाबरतात, आमच्या गीतांना, आणि आमच्या मौनालासुद्धा.

कात्यायनी

---

क्रौर्य हे भेकड लोकांकडून लादण्यात आलेल्या कायद्यांचे व्यवच्छेदक लक्षण आहे, कारण भेकड लोक केवळ क्रूर होऊनच शक्तिशाली बनू शकतात.

कार्ल मार्क्स ('जंगल चोरी कायद्यावरील वाद-विवाद', 1842)

---

क्रांती ही शेकडो-हजारो वर्षे व्यवस्थेच्या जोखडांखाली पिचलेल्या, दबलेल्या व शोषित लोकांसाठी 'उत्सव' असते.

व्लादिमिर लेनिन

---

कायदा हा कोळयाने गुंफलेल्या जाळया सारखा असतो. मोठी माशी त्यातून स्वतःची सहज सुटका करुन घेते, पण छोटी माशी सुटण्याचा जेवढा प्रयत्न करेल तेवढी अधिक फसत जाते

बाल्ज़ाक (महान फ्रेंच लेखक)

---

राज्यकर्त्यांची शक्ती जनतेच्या अज्ञानामध्ये सामावलेली असते. राज्यकर्त्यांना हे तथ्य चांगलच उमगलेलं असतं, त्यामुळे ते नेहमीच योग्य ज्ञान जनतेपर्यंत पोहचण्याला सक्रीय विरोध करतात.

लियो टॉलस्टॉय

# तुमच्या जाती-पातीचा ऱ्हास

✍ **राहुल सांकृत्यायन**

आपल्या देशाला ज्या गोष्टींवर अभिमान आहे, त्यामध्ये जात-पात सुद्धा एक आहे. दुसऱ्या देशांमध्ये जाती-पातीतील भेद समजला जातो तो भाषेच्या भेदावरून, रंगाच्या भेदावरून. आपल्याकडे एकच भाषा बोलणाऱ्या, एकाच रंगांच्या माणसांच्या वेगवेगळ्या जाती असतात. हा अजब जातीवाद भारताच्या सीमेबाहेर पडल्याबरोबर दिसेनासा होतो आणि या भारतीय जातीवादाचा अर्थ काय? धर्म आणि आचरणावर संपूर्ण जोर देणारे दुसऱ्या जातीतील लोकांसोबत जेवण जेऊ शकत नाही, त्यांच्या हाताने पाणीसुद्धा पिऊ शकत नाही, लग्न तर खूप लांबची गोष्ट आहे. मुस्लीम आणि ख्रिस्तीसुद्धा या शिवाशिवीच्या रोगापासून वाचू शकलेले नाहीत, कमीत कमी लग्नसमारंभामध्ये तरी. अस्पृश्यतेचा प्रश्न, जो याच जातीवादाचं सर्वात उग्र रूप आहे, आपल्या इथे सर्वात भयंकर प्रश्न आहे. कितीतरी लोक अंगाला स्पर्श झाल्यास आंघोळ करणे गरजेचं समजतात. किती तरी ठिकाणी अस्पृश्यांना रस्त्यावरून जाण्याचा अधिकार नाही. हिंदुंचे धर्मग्रंथ या अन्यायाची आध्यात्मिक आणि तात्विक कारणं मांडत असतात. गांधीजी अस्पृश्यता संपवू पाहतात परंतु धर्मशास्त्र आणि वेदांचा हवाला सोबत घेऊन चालू पाहतात. हे चिखलानेच चिखल धुण्यासारखे आहे.

अस्पृश्यतेला समजून घेणे दुसऱ्या देशातील लोकांसाठी किती अवघड आहे, याचं उदाहरण मी देतो. 1922 मध्ये जेव्हा ब्रिटीश सरकारने आपला सांप्रदायिक निर्णय दिला आणि गांधीजींनी त्यावर आमरण उपोषण सुरु केले, त्यावेळी मी लंडनमध्ये होतो. खूप दिवसांनंतर ही सनसनाटी बातमी भारताच्या संदर्भात इंग्लंडच्या बातमीपत्रांमध्ये छापून आली. त्यांनी मोठमोठे मथळे देऊन या बातमीला छापले. ज्या देशामध्ये अस्पृश्यता नाही, तेथील लोकांना याबाबतीत काय समजेल? लंडन विद्यापीठामध्ये शिकणारा एक चिनी विद्यार्थी आमच्याकडे आला आणि विचारले-"अस्पृश्यता काय आहे?" मी थोडेसे समजावून सांगायला लागलो. त्याने विचारले-"काय हा एखादा स्पर्शाने पसरणारा आजार असतो की, कोड फुटल्यासारखे काही कारण असते की ज्या कारणाने माणसं व्यक्तीला स्पर्श करु इच्छित नाहीत?" मी म्हणालो की व्यक्ती आपल्यासारखेच निरोगी असतात, हो बहुतेकांची आर्थिक परिस्थिती हलाखीची नक्कीच असते. मी अर्ध्या तासांपेक्षा जास्त कालावधीपर्यंत अस्पृश्यतेबाबत समजावण्याचा प्रयत्न करत राहिलो, परंतु माझ्या मित्राच्या काहीच लक्षात येत नव्हते, तेव्हा मी अमेरिकेतील नीग्रो लोकांचे उदाहरण देऊन समजावायला सुरूवात केली. आता कुठे मी थोडे-फार समजावण्यात यशस्वी झालो, परंतु तरीसुद्धा त्याला समजलेच नाही की एकाच रंगा-रूपाच्या माणसांमध्ये अस्पृश्यता कशी?

गेल्या हजार वर्षांच्या आपल्या इतिहासाला जर आपण पाहिले तर आपल्याला लक्षात येईल की भारतीय जनता विदेशींकडून पददलित झाली, त्याचे मुख्य कारण जातीभेद होते. जातीभेद माणसांना केवळ तुकड्या-तुकड्या विभाजित करत नाही, तर सोबतच तो त्यांच्या मनामध्ये उच्च-नीचतेची जाणीव निर्माण करतो. ब्राह्मण समजतात, आम्ही उच्च आहोत, राजपूत खालचे आहेत; राजपूत समजतात, आम्ही वरचे आहोत, कहार खालचे; कहार समजतात, आम्ही वरचे आहोत, चांभार खालचे; चांभार समजतात, आम्ही वरचे आहोत, मेहतर खालचे आणि भंगी आपल्या मनाला समजाविण्यासाठी कुणाला तरी खालचे म्हणतातच. हिंदुस्तानामध्ये हजारो जाती आहेत आणि त्या सर्वांमध्ये हीच भावना आहे. राजपूत असल्याने हे समजू नका की ते सर्व एकसमान आहेत, त्यांच्यामध्येही हजारो उप-जाती आहेत. त्यांनी उच्च कुळातील मुलीशी लग्न करून आपल्या जातीचे वरचे स्थान सिद्ध करण्यासाठी आपापसात मोठ-मोठ्या लढाया लढल्या आहेत आणि देशाच्या सैनिकी शक्तीचा खुप मोठा अपव्यय केला आहे. आल्हा-उदलच्या लढाया याबाबतीत प्रसिद्ध आहेत.

या जातीभेदाच्या कारणाने देशाच्या रक्षणाचा भार फक्त एकाच जातीवर सोपविला गेला होता. जिथे देशाच्या मुक्तीसाठी संपूर्ण देशाने आहुती देण्यासाठी तयार असायला पाहिजे, तिथे एकाच जातीच्या खांद्यावर ही जबाबदारी देणे खूपच धोकादायक बाब होती. राजपूत जातीने-जेथपर्यंत सैनिकी उत्साहाचा संबंध आहे-स्वत:ला अयोग्य सिद्ध नाही केले, तरी सुद्धा फक्त देशाच्या रक्षणापर्यंतच गोष्ट राहिली नाही, तिथे तर त्याच्या सोबत-सोबत राज्यशक्तीचे प्रलोभनसुद्धा त्यांच्यात खूप जास्त होते आणि यामुळेच ते आपसांत लढत राहिले. त्यांच्या समोर मुख्य मुद्दा होता काही विशेष राजवंशांचे राखण करण्याचा. राजवंशांचे पारंपरिक वैमनस्य-जे की राज्यशक्ती मिळविण्यासाठीच्या कारणामुळेच होते- त्यांनी राष्ट्रीय सैनिकी ताकदीला अनेक तुकड्यांमध्ये वाटले आणि त्या एकजुट होऊन विदेशी ताकदींशी लढू शकल्या नाही. जर जाती-पाती नसत्या तर इतर देशांसारखे सर्व भारतीय देशाच्या स्वातंत्र्यासाठी विदेशींशी लढले असते. जातीय एकतेच्या कारणामुळे छोटे-छोटे देश खूप काळापर्यंत आपले स्वातंत्र्य अबाधित राखण्यात यशस्वी झाले. एवढा मोठा भारत देश जेव्हा की 12व्या शतकामध्येच गुलाम झाला, लंकेचा(सिलोन) छोटा टापू, ज्याची लोकसंख्या पन्नास लाखाच्या आसपास आहे, 1814 पर्यंत गुलाम झाला नाही. बर्मा तर त्याच्यापेक्षाही 50-60 वर्षे पूर्वीपर्यंत स्वतंत्र राहिला. भारताच्या शेजारचे इतके छोटे-छोटे देश इतक्या दिवसापर्यंत आपले स्वातंत्र्य का टिकवू ठेवू शकले आणि आजसुद्धा अफगाणिस्तानसारखे देश स्वतंत्र का आहेत? यामुळेच की तिथे जनता इतक्या तुकड्यांमध्ये विभागलेली नाहीये. तिथे उच्च-नीचतेची भावना इतक्या जास्त प्रमाणात पसरलेली नाही आणि त्यामुळे देशातील सर्वच रहिवासी आपल्या स्वातंत्र्यासाठी क्षत्रिय बनून खांद्याला खांदा लावून लढू शकतात.



भारताच्या इतिहासामध्ये अनेक वेळेला असा काळ आला, जेव्हा की देशाचे स्वातंत्र्य पुन्हा मिळत होते, परंतु आपल्या जुन्या सवयींनी तसे होऊ दिले नाही. शेरशाह वंशाच्या राजमंत्री बहादुर हेमचंद्राने एक वेळेस असा विचार काय केला, दिल्लीच्या गादीवर बसलासुद्धा, परंतु राजपुतांनी त्याला बनिया (व्यापारी) संबोधत त्याचा विरोध केला. दूरदर्शी सम्राट अकबराने संपूर्ण भारताला एकाच जातीखाली आणण्याचं स्वप्न पाहिले. परंतु त्याचे हे स्वप्न, स्वप्नच बनून राहिले. आणि त्यानंतरच्या हिंदू- मुसलमानांनी कधी त्या जातीय ऐक्याच्या स्वप्नाला उघड्या डोळ्यांनी पाहणे पसंत केले नाही. इंग्रजांच्या हातात सत्ता जाण्याअगोदर भारतामधील सगळ्यात मोठे साम्राज्य मराठ्यांचे होते, परंतु तेसुद्धा ब्राह्मण-ब्राह्मणेतर संघर्षामुळे छिन्नविछिन्न झाले. आपल्या पराभवाचा सगळा इतिहास सांगतो की आपण याच जातीभेदाच्या कारणाने या दशेला येऊन ठेपलो.

काँग्रेसने जातीय एकता निर्माण करण्याचा विडा उचलल्याला अर्ध्या शतकाहून अधिक काळ लोटला. जी काही थोडी-फार एकता निर्माण करण्यात ते सफल झाले, त्याचे फलितसुद्धा आपण पाहत आहोत आणि दोन राज्य वगळता उरलेल्या सर्वच राज्यांच्या शासनाची कळसुत्री काँग्रेसच्याच हाती आहे. (सिंधचे सरकार सुद्धा काँग्रेसच्या प्रभावाला मान्यता देते.) परंतु काँग्रेसच्या नेत्यांच्या मानसिकतेमध्ये आपण काय पाहत आहोत? काँग्रेसचे मोठे-मोठे हिंदू नेते जिथे एकीकडे जातीय ऐक्याच्या गर्जनांच्या आरोळ्यांनी आकाश-पाताळ एक करताहेत, तिथे दुसरीकडे "भारतीय संस्कृती" आणि हिंदू धर्माच्या प्रेमामध्ये तसुभरही मागे राहू इच्छित नाहीत. त्यामुळेच ते आपापल्या छोट्याश्या जातीय परिघातून बाहेर येण्याची हिंमतही करत नाहीत. कायस्थ काँग्रेस नेते कायस्थ जातीचे ऐक्य आणि पुढारपणाची काळजी खुप जास्त वाहतात. जेव्हा त्यांचे लग्न किंवा जन्म-मृत्यू आपल्याच जातीमध्ये होणार असेल तर त्यांचे तर विश्वच कायस्थांमध्ये आहे. कायस्थ नातेवाईकांना-भलेही ते योग्य असो की अयोग्य, त्यांच्या आणि त्यांच्या परिवारासाठी काहीतरी उपजीविकेचा प्रबंध करणे तर गरजेचे आहे-काहीतरी नोकरीची व्यवस्था करावीच लागेल आणि अशा जाती-भक्तांच्या कामासाठी कोणताच अन्याय, अन्याय असत नाही; पाप, पाप असतच नाही. भूमिहार (शेतकरी) काँग्रेस नेते आहेत. जोपर्यंत भूमिहार जातीपेक्षा स्वतंत्र त्यांचं काही नातं-गोतं नाही, तोपर्यंत ते कसे काय भूमिहारांच्या बाहेरच्या दुनियेला त्यांची दुनिया समजतील? आपल्या नेत्यांमध्ये ही जातीयतेची भावना किती दृढ आहे, हे सगळेच जाणतात. याच भावनेमुळे आपले सार्वजनिक आयुष्य अतिशय घाण झाले आहे, आणि राष्ट्रीय शक्ती सबळ होत नाहीये. राजकीय गट तर पहिल्यापासुनच आहेत, यामध्ये जातीय गटबाजी या अवस्थेला आणखीच भयंकर बनवते. हा जातीवाद फक्त हिंदू नेत्यांमध्येच आहे, असे नाही, तर मुसलमान आणि इतरसुद्धा यापासून वाचलेले नाहीत. मुस्लिमांच्या वरच्या जातीतील नेत्यांच्या स्वार्थ आणि संकुचितपणामुळे तिथेसुद्धा मोमीन आणि गैर-मोमीनचा प्रश्न उपस्थित झालाय. अद्यपी मुस्लिम नवाबांचा आणि शेठ-सावकारांचा बरोबर असा प्रयत्न राहिलाय की बाजा आणि गोहत्येचा चा प्रश्न उभारून खालच्या श्रेणीतील लोकांना त्या प्रश्नापासून वेगळं ठेवावं. परंतु निश्चितच यात अपयश येईल. राष्ट्रीय नेत्याची दृष्टी अतिशय व्यापक असली पाहिजे. त्याचा अभ्यास आणि अनुभव विस्तृत असतो आणि या प्रकारे तो भविष्याविषयी अधिक दूरपर्यंत विचार करू शकतो. परंतु त्यांची अशी ही शोचनीय मनोवृत्ती आहे. बिहार राज्यातील काँग्रेसी नेते आणि मंत्र्यांच्या या जाती-पातीच्या भावनेने अतिशय घृणास्पद स्वरूप धारण केले आहे. मंत्री आपल्या जातीच्या सदस्यांची ठोस जमात आपल्या मागे ठेवून त्याच दृष्टिकोणातून काम करतात आणि परिस्थिती येथपर्यंत येऊन पोहोचली आहे, की जर दृष्टिकोणामध्ये परिवर्तन नाही झाले, तर सार्वजनिक जीवनातील घाण पराकोटीला पोहोचेल.

ह्या सगळ्या घाणी त्याच लोकांकडून पसरविल्या गेल्या आहे, जे धनी आहेत किंवा धनिक होऊ पाहताहेत. पैसा जमा करून ठेवणे किंवा त्याची राखण करणे, हा विचार या सर्वांमागे आहे. गरीब आणि स्वत:च्या कष्टाची कमाई खाणाऱ्यांचेच सर्वात जास्त नुकसान होते. परंतु शतकानुशतकांपासून जाती-पाती विषयी लोकांमध्ये जो विचार निर्माण केला गेलाय, तो त्यांना आपल्या वास्तविक परिस्थितीकडे नजर सुद्धा फिरवू देत नाही. स्वार्थी नेता स्वत:च यामध्ये सर्वात मोठा अडथळा आहेत.

पान 7 वर

**लेखकाचा परिचय**

*राहुल सांकृत्यायन खऱ्या अर्थाने जनतेचे लेखक होते. ते आजच्यासारख्या तथाकथित प्रगतिशील लेखकांसारखे नव्हते, जे जनतेच्या जीवन आणि संघर्षापासून अलिप्त राहून आपापल्या महालांमध्ये बसून कागदावर प्रकाश टाकत असतात. जनतेच्या संघर्षाचे मोर्चे असोत वा सरंजामदार-जमीनदारांच्या शोषण-दमनाच्या विरुद्ध शेतकऱ्यांच्या संघर्षाचा लढा असो, ते नेहमीच पहिल्या फळीत उभे राहिले. अनेक वेळा तुरुंगात गेले, यातना सहन केल्या. जमीनदारांच्या भाडोत्री गुंडांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्लासुद्धा केला, परंतु स्वातंत्र्य, समानता आणि मानवी स्वाभिमानासाठी ते ना कधी संघर्षातून मागे हटले आणि ना कधी त्यांची लेखणी थांबली.*

*जगभरातील 26 भाषा अवगत असलेल्या राहुल सांकृत्यायन यांच्या अचाट बुद्धीचे अनुमान यावरूनसुद्धा लावता येऊ शकते की, ज्ञान-विज्ञानाच्या अनेक शाखा, साहित्याच्या अनेक प्रकारांमध्ये त्यांनी हातोटी मिळवली होती. इतिहास, तत्वज्ञान, पुरातत्वशास्त्र, मानववंशशास्त्र, साहित्य, भाषा-विज्ञान इ. विषयांवर त्यांनी अधिकारवाणीने लेखन केले. बौद्धिक गुलामी, तुमचे अध:पतन, पळू नका-जगाला बदला, तत्वज्ञान-संदर्भ, मानवसमाज, वैज्ञानिक भौतिकवाद, जय यौधेय, सिंह सेनापती, साम्यवादच का?, बावीसावे शतक इ. रचना त्यांच्या महान प्रतिभेची ओळख स्वत:हूनच करून देतात.*

*राहुल देशातील दलित-शोषित जनतेला हर-तऱ्हेच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी लेखणीचा हत्यारासारखा वापर करायचे. त्यांचं म्हणणं होतं की, "साहित्यकार जनतेचा जबरदस्त सहकारी, सोबतच तो त्यांचा नेता (पुढारी) आहे. तो सैनिक आहे आणि सेनापतीसुद्धा."*

*राहुल सांकृत्यायन यांच्यासाठी जीवनाचं दुसरं नाव गती होतं आणि मरण किंवा स्तब्धतेचं दुसरं नाव होतं गतिरोध. यामुळेच अगोदरच तयार असलेल्या मार्गावर चालणे त्यांना कधीही आवडले नाही. ते नव्या मार्गाचे संशोधक होते. परंतु फिरणे म्हणजे त्यांच्यासाठी फक्त भूगोलाची ओळख करून घेणे नव्हते. ते सुदूर देशांतील जनतेचं जीवन आणि त्यांच्या संस्कृतीशी, त्यांच्या जिजीविषेशी ओळख करून घेण्यासाठीचं फिरणं होतं.*

*समाजाला मागे ढकलणाऱ्या हरतऱ्हेच्या विचार, रुढी, मूल्ये, मान्यता-परंपरांच्या विरूद्ध त्यांचे मन अतिशय तिरस्काराने भरलेले होते. त्यांचं संपूर्ण जीवन आणि लिखाण याविरूद्ध विद्रोहाचं जितं-जागतं उदाहरण आहे. यामुळेच त्यांना महाविद्रोहीसुद्धा म्हटले जाते. राहूल यांची ही वेगळी रचना आजसुद्धा आपल्या समाजातील प्रचलित रुढी-परंपरांच्या विरूद्ध तडजोड विहीन संघर्षाची आरोळी आहे.*

# तुमच्या जाती-पातीचा ऱ्हास

पान 6 वरून

जगाच्या गतिकीचे ज्ञान आपल्याला सांगत आहे, की आपण अधिक काळपर्यंत या जातीय भेदभावाला कायम ठेवू शकत नाही. जगाच्या चाली-रितींना पाहून आता भारतातील अस्पृश्य, अस्पृश्य बनून राहायला तयार नाहीत, अर्जल (कनिष्ठ जाती), अर्जल राहण्यास तयार नाहीत. अस्पृश्य आणि कनिष्ठ बनवून ठेवत फक्त त्यांच्याशी अपमानजनक वर्तन केले जात नाही, तर आर्थिक स्वातंत्र्यापासून सुद्धा त्यांना वंचित ठेवले जातेय. मग ते का समाजामध्ये शतकानुशतके ठरवून दिलेल्या स्थानी राहणे पसंत करतील आणि स्वातंत्र्याच्या चाहत्यांनी तर या प्रथेविरुद्ध जिहाद पुकारलाय. ते यासाठी सर्व प्रकारचा त्याग करण्यास तयार आहेत. त्यांच्यासाठी राजकीय युद्धापेक्षा हे सामाजिक युद्ध काही कमी महत्वाचे नाही. ते ओळखून आहेत, की जोपर्यंत या जातींच्या दऱ्या बुजविल्या जाणार नाहीत, तोपर्यंत जातीय ऐक्याचा मजबूत पाया रचता येणार नाही. त्यांना माहितीये, की या मार्गामध्ये त्यांचा धर्मच त्यांच्यासाठीचा मोठा अडथळा आहे. परंतु ते कधी धर्माची भीड ठेवणार आहेत? ते जाती-पातीच्या सोबत हिंदू धर्माला एकाच दांड्याने मारुन समुद्रात बुडवतील.

वरवर पाहता जाती-पातीची इमारत मजबूत वाटते. परंतु यावरून असे वाटले नाही पाहिजे की तिच्या पायावर जोरदार आघात होत नाहीयेत. जातीभेदाचे दोन प्रकार आहेत. एक, अन्नामध्ये शिवाशीव आणि दूसरा, मुलींच्या बाबतीत असहयोग. अन्नामधील अस्पृश्यता त्याच श्रीमंतांनी अगोदर मोडीत काढायला सुरुवात केली, जे आपल्या स्वार्थाला अबाधित ठेवण्यासाठी जातीय संघटना आणि जातीय एकतेचे सर्वात मोठे पोषणकर्ते होते. त्यांच्याकडे धन होते आणि विदेशात जाण्यासाठी सर्वांच्या अगोदर तेच तयार झाले. जिथे अगोदर विदेशी जाणारे जातीतून बहिष्कृत केले जात होते, तिथे आज तेच जातीचे प्रमुख आहेत. दरभंगा बिकानेरच नाही तर दुसऱ्या जातीतील पुढे आलेल्यांना सुद्धा पाहून घ्या. सर्व ठिकाणी विदेशामध्ये सर्व प्रकारच्या लोकांसोबत, सर्व प्रकारचे खाद्यान्न खाऊन परतलेले लोकच आज नेते पदावर विराजमान आहेत. आई. सी. एस. जावई मिळवण्यात सासरा स्वत:ला भाग्यशाली समजतो.

मागील वीस वर्षांपासून भाकरीची एकता मोठ्या गतीने रुढ होत आहे. 1921 च्या अगोदर हिंदूंचे हॉटेल कदाचित कुठेतरीच दिसायचे. परंतु आज छोट्या-छोट्या शहरांमध्येच चार-चार, सहा-सहा डझन हॉटेल नाहीत, तर छोट्या-छोट्या स्टेशनांवर सुद्धा हॉटेल उघडलेले आहेत. काही वर्षे अगोदर पर्यंत कुणाला वाटत होते की छपरा स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर हिंदू दुकानवाला मटन-पराठे विकत फिरेल. माझे एक मित्र एक दिवस पटन्यात हॉटेलमध्ये जेवायला गेले. त्यांच्या बाकड्याच्या बाजूला एक मुलगा बसला होता आणि त्याच्या बाजूला एक मिथिलेचे (तिरहुतिये) ब्राह्मण चंदनाचा टिका लावून बसला होता. बाकडं छोटं असल्यामुळे मुलाचा हात ब्राह्मण देवांच्या शरीराला लागला. तो एकदम लालेलाल झाला आणि रागात जात विचारू लागला. आमच्या सहकाऱ्याने मुलाला गुपचूप सांगितले-म्हण रैदास भगत(चांभार). मुलाने जेव्हा असे सांगितले, तेव्हा ब्राह्मणाच्या तोडातील घास तोंडातच राहिला. तो आता बोलण्यासाठी काही विचारच करत होता, की आजूबाजुचे लोक त्याच्यावर एकदम चिडले- हे हॉटेल आहे, इथे डाळ-भाताची विक्री होते. तू जात-पात का विचारली? ब्राह्मणदेव विचित्र परिस्थितीत सापडले. जर जेवण सोडून निघून जावं, तर फक्त पैशांचाच भुर्दंड पडेल, असे नाही तर सर्व लोकांना उघड-उघड खिल्ली उडवण्याचा मौका मिळेल म्हणुन बिचाऱ्याने खाली मान घालून गुपचूप जेवण उरकून घेतले.

भाकरीच्या शिवाशिवीचा प्रश्न बऱ्यापैकी सुटल्यासारखाच आहे. शिकलेले तरुण यामध्ये हिंदू-मुस्लिमचा भेदभाव पाळू इच्छित नाहीत. परंतु लग्नाचा प्रश्न अजूनही अवघडच दिसतोय. एक दिवस रेल्वेत प्रवास करत असताना मला एक मुस्लिम नेते भेटले. ते समाजवादी नावाने जरा जास्तच घाबरलेले होते. म्हणाले, समाजवादी जर लोकांचे दारिद्र्य हटवू पाहत आहेत तर इस्लामसुद्धा मसावातचा (समानतेचा) प्रचारक आहे. परंतु ते धर्माच्या विरोधात का आहेत?

मी:- "साम्यवादी धर्माच्या विरोधात आपली ताकद तिळभरही खर्चू इच्छित नाहीत. त्यांना तर वाटते की जगात अन्याय आणि गरिबी राहिली नाही पाहिजे."

मौलाना: "यामध्ये आम्ही सुद्धा तुमच्या सोबत आहोत."

मी:- "तुम्ही सुद्धा सोबत आहात? काय तुम्ही सर्व भारतीयांशी रोटी-बेटी व्यवहार करण्यास तयार आहात?"

मौलाना:- "याची काय आवश्यकता आहे?"

मी:- "कारण गरीब तोपर्यंत स्वातंत्र्य नाही मिळवू शकत जोपर्यंत आपली कमाई स्वत: खाण्याचा हक्क नाही मिळवू शकत, जोपर्यंत कि ते एकजूट होऊन आपल्या शोषणकर्त्यांचा (ते देशी असोत वा विदेशी) सामना करून त्यांना पराभूत नाही करत."

मौलाना:- "रोटीपर्यंत तर आम्ही तुमच्या सोबत आहोत, परंतु बेटीमध्ये नाही."

जवळच एक पंडीतजी बसलेले होते, जे त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीमुळे वकील वाटत होते. ते एकदम बोलले - "तुम्ही तर दुसऱ्या देशाच्या साच्यामध्ये भारताला सुद्धा बसवू पाहत आहात. तुम्ही लोक हा विचार करण्याचं कष्ट नाही करत की हिंदुस्तान धार्मिकतेला मानणारा देश आहे, याची सभ्यता आणि संस्कृती वेगळी आहे. भारताचा युरोप नाही होऊ शकत. रोटीचा प्रश्न तर चला सुटल्यासारखाच आहे, परंतु बेटी प्रश्नावर ऐक्य होण्याची गोष्ट करून तुम्ही शेख चिल्लीवर सुद्धा मात करत आहात."

मी:- "काही वर्षांपूर्वी रोटीतील ऐक्य सुद्धा शेख चिल्लीचीच बात होती. जाऊ द्या, आज तुम्ही तिला तर मान्य करत आहात ना? बेटीची बात सुद्धा शेखचिल्लीची नाही. वीस वर्षांपूर्वीच्या खाण्यापिण्याच्या पद्धतीला पाहून कोणाला तरी आशा होती का, की आजचा दिवस पहावा लागेल? हिंदू उघड-उघड मुसलमान आणि इसाईंसोबत जेवण करतात, परंतू कोणत्याही जातभाईंची हिंमत आहे का त्यांच्याशी नाते-संबंध तोडायची? हिंदू-मुसलमानांमध्ये विवाह व्हायला लागलेत. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या पुतणीने मुसलमानासोबत लग्न केले तेही कलमा न पढता. आसफ अलींची पत्नी अरूना यांनी मुस्लिम धर्म स्विकारला नाही. प्रोफेसर हुमायूं कबीर यांनी सुद्धा बंगालमध्ये याच प्रकारचे लग्न केल आहे. अशी डझनभर उदाहरणं सापडतील की ज्यामध्ये हिंदू मुलींनी लग्नानंतरही आपला धर्म बदलला नाही. हिंदू नवयुवक सुद्धा धर्माच्या बेड्या तोडून आंतरधर्मीय विवाह करताहेत. गोरखपूरमधील श्री शामाचरण शास्त्रींनी कोणताही शुद्धी-विधी न करता मुस्लिम मुलीशी विवाह केला आहे . गुजरातमध्ये एका उच्चभ्रू कुळाच्या हिंदू युवकाने प्रतिष्ठित मुस्लिम सुशिक्षित मुलीशी लग्न केले आहे. हे निश्चितच आहे की दिवसेंदिवस अशा विवाहांची संख्या वाढतच जाणार आहे. समाजाच्या मजबूत भिंतीमध्ये जिथे सुई इतकेही भोक पडले ते पुन्हा भरून निघणे अवघड आहे."

जात पात लाथाडून एकाच धर्मात झालेले विवाह तर यापेक्षाही जास्त आहेत. परंतु आमच्या देशाचे दुर्भाग्य आहे की जे काम निश्चितच केले पाहिजे, त्याला सुद्धा लोक अगदी संथपणाने करू पाहतात. जातींचे मजबूत ऐक्य आपल्यासाठी सगळ्यात आवश्यक बाब आहे आणि ती धर्म आणि जातींच्या भिंतींना पाडूनच कायम केल्या जाऊ शकते. आपली सामाजिक गती जिला आवश्यक बाब म्हणून सांगत आहे, जी पूर्ण करण्याशिवाय आपल्याकडे दुसरा पर्याय नाही, तिला इतक्या ढिलेपणाने करणे हा मूर्खपणा नाही तर काय आहे?

हिंदुस्तानी जाती एक आहेत. सर्व हिंदुस्तानी जरी ते हिंदू असोत वा मुस्लिम, बौद्ध असोत वा ख्रिस्ती, धर्माला मानणारे असोत वा निधर्मी; त्यांची एकच जात आहे-हिंदुस्तानी, भारतीय. हिंदुस्तानच्या बाहेर युरोप आणि अमेरिकेतच नाही तर शेजारच्या इराण आणि अफगाणिस्तानमध्ये सुद्धा आपल्याला हिंदी याच नावाने संबोधले जाते. हिंदुसभेवाले त्यांच्यातील जातीयता तोडण्यासाठी भलेही पाहिजे तेवढा उत्साह दाखवत नसतील, परंतु ते वेळोवेळी ही घोषणा जरूर करत असतात की हिंदू जाती वेगळ्या आहेत. मुस्लिम लिगने तर विडाच उचललाय की मुस्लिमांची सदासर्वकाळासाठी एक वेगळी जात असावी. ते तर याच विचारधारेच्या आधारावर हिंदुस्तानला दोन वेगवेगळ्या भागांमध्ये विभागू पाहतात. नऊ करोड मुस्लिमांमधील सात करोड मुस्लिमांमध्ये तेच रक्त आहे जे हिंदूंच्या शरिरात वाहतेय आणि उरलेले दोन कोटी मध्ये कितीजण आपल्या छातीवर हात ठेवून म्हणू शकतात की त्यांच्यामध्ये एक चतुर्थांश सुद्धा गैर हिंदुस्तानी रक्त आहे? जातीचा निकाल रक्ताने लावला जातो आणि या कसोटीवर तपासणी केल्यावर जगातील कोणतीच व्यक्ती-हिंदुस्तानच्या बाहेर-हिंदुस्तानच्या मुस्लिमांना वेगळी जात मानण्यास तयार होणार नाही. तीन चतुर्थांश अरबी शब्द बोलून भारतीय मुसलमान ना अरब मध्ये जाऊन 'हिंदी' सोडून काही अन्य म्हणून ओळखला जाईला, ना अरबी बोलीला तो आपली मातृभाषा बनवू शकेल. आमचे नवयुवक या विभाजनाला अधिक काळ सहन करू शकत नाहीत. नव्या बालकांसाठी तर हे चांगले होईल की हिंदूंची मुले आपलं नाव मुसलमानी ठेवतील आणि मुसलमानांची मुले आपलं नाव हिंदू ठेवतील. सोबतच धर्मांना जबरदस्त विरोध केला जावा. रंग-रुपाच्या बनावटी भेदाला नष्ट करावे. या पद्धतीने धर्माच्या वेड्यांना आम्ही चांगली शिकवण देऊ शकू.

निश्चितच जाती-पातीचा विनाश केल्याने आमच्या देशाचे भविष्य उज्ज्वल होऊ शकेल.

*अनुवाद - प्रविण सोनवणे*

# महाराष्ट्रात आणि देशात जातीय अत्याचार चालूच

पान 9 वरून

जातिव्यवस्थेवर घोषित स्वरूपात विश्वास ठेवते. याच कारणामुळे भाजपा सत्तेत येताच आरक्षणाला अघोषित पद्धतीने संपवण्यासाठी तयारी केली जात आहे आणि सुप्रीम कोर्टाच्या माध्यमातून ॲट्रॉसिटी कायद्याला कमजोर करण्यासाठी प्रयत्न करत आहे. या सरकारचे जातीयवादी चरित्र यातूनही स्पष्टपणे दिसून येते की भीमा कोरेगाव प्रकरणामध्ये खऱ्या आरोपींना अटक करणे सोडून निर्दोषांनाच अडकवण्याचे काम हे सरकार करत आहे. यामुळेच आज जातिव्यवस्थेविरुद्ध आणि जातीय अत्याचारांविरुद्धचे कोणतेही आंदोलन या सर्व निवडणुकबाज पक्षांच्या विरुद्ध सर्वसामान्य कष्टकरी जनतेच्या एकतेद्वारेच पुढे जाऊ शकते.

इतर सर्व जातीतील कष्टकरी कामगार मित्रांना, तरुणांना आज हे प्रकर्षाने समजून घ्यावे लागेल की, जोपर्यंत कष्टकरी, कामगार वर्ग जातीच्या नावाखाली विभागून राहील तोपर्यंत संपूर्ण कष्टकरी समाज दुर्दशेत राहील. आज तरुणांना आरक्षणाच्या नावाखाली लढवले जात आहे. परंतु मित्रांनो, तुम्हाला माहित नाही का की आज सर्व सरकारी नोकऱ्या संपण्याच्या मार्गावर आहेत? एका पदासाठी हजार उमेदवार अर्ज करत आहेत. आता या पदावर आरक्षण असो किंवा नसो, बाकी हजारो तरुणांना तर बेरोजगार फिरावेच लागत आहे. अशामध्ये आपल्याला आरक्षण संपविण्यासाठी किंवा एखाद्या जातीला आरक्षण वाढवून देण्याच्या मागणीसाठी आपली ऊर्जा निरर्थक वाया घालवली नाही पाहिजे. उलट सर्वांसाठी मोफत शिक्षण आणि कायम स्वरूपाच्या रोजगार हमीसाठी सरकार विरोधात संघर्ष उभा करणे गरजेचे आहे.

सर्व दलित बंधू-भगिनींना आज भगतसिंहाचे हे शब्द ध्यानात ठेवावे लागतील, "उठा, आपल्या शक्तीला ओळखा! संघटीत व्हा! खरंतर स्वतः प्रयत्न केल्याशिवाय काहीच मिळणार नाही. ज्यांना स्वातंत्र्य हवे आहे त्यांनी स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करायला पाहिजे. अशी म्हण आहे कि, 'लातों के भूत बातो से नही मानते.' म्हणजे संघटीत होऊन आपल्या पायावर उभे राहा व सर्व समाजाला आव्हान द्या! तेव्हा बघा, कोणीसुद्धा तुम्हाला तुमचे अधिकार देण्यापासून नकार देण्याची हिंमत ठेवणार नाही. तुम्ही दुसऱ्याचा खुराक बनू नका, दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहू नका. परंतु ध्यानात ठेवा, नोकरशाहीच्या भुलाव्याला फसू नका. हे तुमची कोणत्याच प्रकारे मदत करू इच्छित नाहीत. उलट तुम्हाला आपलं प्यादं बनवू पाहत आहेत" ('अस्पृश्य समस्या', भगतसिंह). असे वाटते की शहीद भगतसिंहांचे हे शब्द जणू आजच्यासाठीच लिहिले आहेत. आज आपल्याला याच कार्य दिशेला समजण्याची गरज आहे.

सर्वच कष्टकरी कामगार बंधू-भगिनींनी हे लक्षात घेतले पाहिजे की, जर तुम्ही तथाकथित खालच्या जातीतील कष्टकऱ्यांना गुलाम समजाल, तर विसरू नका की तुम्ही सुद्धा या नफ्या-तोट्यावर आधारित भांडवली व्यवस्थेत गुलाम म्हणून जगण्यास अभिशप्त रहाल! भगतसिंहाने सांगितले होते की, कामगार क्रांती व मजुरांची सत्ता स्थापित होण्यासाठी कामगारांची वर्गीय एकजुटता ही पूर्वशर्त आहे. वर्गीय एकजुटता तेव्हाच होऊ शकेल जेव्हा आपण या जातीपातीच्या भुताला कायमचे गाडून टाकू. त्यामुळे जातीव्यवस्थेविरोधात एकत्र येऊन एल्गार पुकारणे हे कामगार वर्गाचे कर्तव्य बनते.

# जगात सर्वात जास्त बेरोजगारांचा देश बनला भारत

पान 1 वरून

आकडेवारी नुसार देशात रोजगारा पासून वंचित तरुणांची संख्या खूप मोठी आहे, ज्यामुळे समाजात असंतोष वाढत आहे.

या प्रमाणेच देशातील एकूण कामगार लोकसंख्येत महिलांची हिस्सेदारी केवळ 27 टक्के आहे (कामगार लोकसंख्येत घरकाम, देखभाल करणे सारखी कामे जोडल्या जात नाहीत कारण त्यांना कामाचा मोबदला मिळतं नाही). विश्व बँकेचे अंदाज सांगतात की 2004-05 ते 2012-13 पर्यंत 19.6 टक्के महिला कामगार लोकसंख्येच्या बाहेर निघून गेल्या आहेत जो की खूप मोठा आकडा आहे. तरीही हे आकडे पूर्ण सत्य सांगत नाहीत कारण महिलांची मोठी संख्या घरी राहून पिस-रेट वर केल्या जाणाऱ्या कामासोबत संलग्न आहेत आणि ही संख्या नेहमीच मोजमापाच्या बाहेर राहून जाते. आंतरराष्ट्रीय नाणे निधीचा अंदाज आहे की जर भारतात महिला कामगारांची संख्या पुरुषांच्या एवढी झाली तर सकल घरगुती उत्पादनात 27 टक्के वाढ होईल. अशा हवाई अंदाजांवर फक्त हसले जाऊ शकते कारण आधीपासूनच उपलब्ध असलेल्या कामगार लोकसंख्येतील मोठ्या हिश्श्याला काम मिळत नाही तर महिलांच्या या विशाल लोकसंख्येला रोजगार कुठून मिळणार? सरकार आणि भांडवलदारांच्या संस्था महिलांना कामावर ठेवण्यासाठी वेगवेगळ्या योजना बनवत आहेत कारण त्यांच्याकडून कमी रोजावर काम करून घेतल्या जाऊ शकते. महिलांना गुलाम बनवून ठेवणे सोपे असते हा त्या मागील विचार आहे.

मागील काही वर्षांपासून मेक इन इंडिया, कौशल्य भारत, प्रधानमंत्री रोजगार प्रोत्साहन योजना, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना सारख्या योजना बनवल्या जात आहेत. पण या योजनांचे कार्यालय आणि प्रचार सांभाळणाऱ्या लोकांना रोजगार देणे सोडले तर देशात बेरोजगारी कमी करण्याच्या दिशेने काहीच प्रगती झाली नाहीये. खूप योजना तर निवडणुकीतील घोषणांप्रमाणे तयारी न करता सुरू करण्यात आल्या. उद्योगांची गरज आणि तरुणांना दिले जाणारे कौशल्य यात काहीच ताळमेळ नाहीये आणि खुप साऱ्या बाबतीत तर इतके निकृष्ट प्रशिक्षण दिले जाते की त्यामुळे रोजगार मिळत नाही.

जागतिक मंदी, नोटबंदी आणि जीएसटी चा मार

ज्या उद्योगात सर्वात जास्त रोजगार मिळतात त्यांची परिस्थिती वाईट आहे. लाईव्ह मिंट वर्तमान पत्रानुसार या कंपन्यांची फक्त निर्यातच मंदावलेली नाही आहे तर औद्योगिक उत्पादनाचे आकडे सांगतात की या क्षेत्रांची आर्थिक वाढही खूप मंद आहे. या सर्व बाबींमुळे रोजगाराची स्थिती अजून वाईट होणार आहे.

भारतातील श्रम-गहन उद्योग जसे की कापड उद्योग, आभूषण, हिरे- जवाहर, चमडा इत्यादींमधील निर्यात कमी होत आहे. मागच्या वर्षी जुलैमध्ये जीएसटी लागू झाल्यानंतर यामध्ये वेगाने घट होत आहे. याआधी नोटबंदी दरम्यान सुरत मधील आभूषण उद्योगांतील हजारो कामगार तसेच देशातील लाखो कामगारांचे काम निघून गेले होते. त्यातील बहुसंख्य अजूनही कामापासून वंचित आहेत. चमडा, कापड, हस्तशिल्प, खेळण्याच्या वस्तू, फर्निचर आणि उद्योग उत्पादनातील अन्य वस्तूंच्या औद्योगिक उत्पादन निर्देशांकात मागच्या वर्षी एप्रिल पासून वेगाने घट झाली आहे. ज्या क्षेत्रात श्रम गहनता कमी आहे आणि जेथे रोजगार कमी तयार होतात त्यांच्यात आता उभार आला आहे.

अहवाल सांगतात की निरव मोदी आणि मेहुल चौकसी या महारथींच्या कारनाम्या नंतर आभूषण आणि जवाहर उद्योगांसाठी कर्ज मिळण्यात अडचण होईल. याचा सरळ प्रभाव रोजगारावर पडेल.

कापड उद्योगात शेजारील देश बांगलादेश आणि व्हिएतनाम सोबत तीव्र प्रतिस्पर्धा आहे. नेपाळ आपली स्वस्त श्रमशक्ती कापड कंपन्यांच्या सेवेत लावण्यासाठी वेगाने एसईझेड इत्यादी बनवण्यात लागला आहे. या कारणामुळे नजीकच्या भविष्यात या क्षेत्रात रोजगार वाढण्याची संभावना कमीच वाटत आहे. भारतातून निर्यात होणाऱ्या कापडात सर्वात मोठा वाटा धागे, टॉवेल आणि शिवलेले कपडे यांचा आहे. मागच्या पूर्ण वर्षात भारतातून धाग्याची निर्यात कमी झाली आहे. जून 2017 पासून संयुक्त अरब अमिरातला होणाऱ्या निर्यातीत 45 टक्के घसरणी मुळे शिवलेल्या कपड्यांच्या निर्यातीची परिस्थिती खराब आहे. ट्रान्स पॅसिफिक भागीदारी आणि युरोपीय संघ- विएतनाम मुक्त व्यापार करारानंतर या बाजारात विएतनामची हिस्सेदारी अजुन वाढेल ज्याचा सरळ प्रभाव भारतावर पडेल. भारतीय निर्यातीचा एक मोठा खरेदीदार असलेल्या अमेरिकेमधील वाढत्या संरक्षणवादामुळे भारतीय निर्यातदारांमध्ये निराशा वाढू शकते. मोदी भक्त डोनाल्ड ट्रम्पची कितीही भक्ती करू देत, ट्रम्प संकटातून जाणाऱ्या अमेरिकी अर्थव्यवस्थेचे हित पाहील, ना की भारतीय भांडवलदारांचे.

एकंदरीतच सर्वात जास्त रोजगार देणाऱ्या क्षेत्रांची परिस्थिती लवकर सुधारताना दिसत नाहीये. निर्माण उद्योगही याच परिस्थितीतून जात आहे. देशभरात लाखो इमारती रिकाम्या पडलेल्या आहेत. निर्माण कार्यात मोठी मंदी आहे. अहवालानुसार उत्पादन आणि निर्यातीतील मंदीचा प्रभाव संपूर्ण उपभोगावर पडेल ज्याच्या प्रभावामुळे सेवाक्षेत्रात मंदी येऊ शकते. ग्रामीण अर्थव्यवस्थेवर याचे परिणाम दिसायला लागले आहेत.

देशावर सत्ता गाजवणाऱ्या जुमलेबाजांच्या बोलण्यावर विश्वास ठेवू नका. कावळा कान घेऊन गेला प्रमाणे आपल्याला कोणी कोणाविरुद्ध भडकवत असेल तर डोळ्यावर पट्टी बांधून आगीत उडी घेऊ नका. देश समाज आणि आपल्या जीवनाच्या खऱ्या स्वरूपाला ओळखा. खऱ्या प्रश्नांवर लढण्याची तयारी करा नाहीतर उद्यापर्यंत वाचवायला काही वाचणार नाही.

*अनुवाद - प्रवीण एकडे*

# सावधान! सावधान! सावधान!

# गुंगीचे विषारी खुराक चारणाऱ्या टोळीपासून सावधान...!!!

सर्वांना सुचित करण्यात येत आहे की बऱ्याच काळापासून एक टोळकं मेंदूला गुंगीचे विषारी खुराक चारून देशातील जनतेची लूट करत आहे. ज्या प्रकारे बस-ट्रेन मध्ये अगोदर लोकांशी मैत्री करून, नंतर मिठाईतून गुंगीचे औषध चारून त्यांना लुटणाऱ्या टोळ्या काम करतात, त्याचप्रकारे या टोळीचे लोक अगोदर सबका साथ-सबका विकास, प्रत्येकाला 15 लाख अशा जुमल्यांनी लोकांना लाडी लावून आणि नंतर देशभक्ती, गोमाता, भारत माता, राम मंदिर यांच्या मिठाईत घातलेले आपले गुंगीचे औषध लोकांना चारून त्यांना बेशुद्ध करत आहेत. बस-ट्रेन मधल्या गुंगीच्या औषधाचा परिणाम आपल्यावर 24 तास काय तो राहतो, पण या नवीन टोळक्याच्या गुंगीच्या औषधाच्या विषाचा परिणाम किती दिवस राहील हे सांगणं कठीण आहे. याचा इलाज जर वेळेत केला नाही तर आपला देश आणि पिढ्यान-पिढ्या बरबाद होऊ शकतात.

पूर्वी या टोळीला 'चड्डी गँग' किंवा 'चड्डीबनियान टोळी' या नावाने ओळखले जात होते. पण आता विश्वसनीय सूत्रांकडून समजले आहे की यांनी चड्डीच्या ऐवजी 'विजार' वापरण्यास सुरुवात केली आहे. म्हणून सर्वसामान्य जनतेला सावधान करण्यात येत आहे की, नवीन पॅकिंग बघून धोका खाऊ नका, कारण आतला माल जुनाच आहे!


जर तुम्हाला तुमच्या आसपास या टोळीच्या विषाने प्रादुर्भाव झालेला एखादा इसम दिसला तर बिलकुल डोळेझाक करू नका. त्या इसमाला योग्य उपचाराची गरज आहे. या विषयुक्त खुराकाची लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत- स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, लोकशाही इ. तत्त्वाच्या गोष्टी ऐकताच चेहरा लाल होणे, तोंडावाटे फेसाबरोबर शिव्यांचा रतीब सुरू होणे, एका तर्काच्या उत्तरात 50 कुतर्कांबरोबरच मोठ्या आवाजात ओरडणे, इ. नेहमी दिसून आले आहे की, असल्या रोग्याला आजच्या सद्यपरिस्थिती बाबत काही जरी विचारले तर तो 3, 10, 70, 1000 वर्षांपूर्वीच्या या ना त्या फालतू गोष्टींबाबत बरळण्यास सुरवात करतो.

या जहाल विषयुक्त खुराकाच्या उताऱ्याची माहिती लवकरच तुमच्यापर्यंत पोहोचवली जाईल.

तत्पूर्वी आपल्या देशाला असले गुंगीचे विषारी खुराक देणाऱ्या टोळीपासून वाचवण्यासाठी हा संदेश नक्कीच फॉरवर्ड करा.

*देशहितासाठी प्रसारित*

*नौजवान भारत सभा*



कार्टूनिस्ट - तन्मय त्यागी

## “गोमाते”च्या नावाने हत्याकांडांचे सत्र

*मुस्लिमांचा जाहीर तिरस्कार करणाऱ्या मोदींचे सरकार सत्तेवर आल्यानंतर देशातील फॅसिस्ट हिंदुत्ववादी गोभक्तांचा हैदोस वाढला असून गोरक्षणाच्या नावाने गुंड टोळ्यांकडून बेमुर्वतपणे निर्दोष लोकांच्या, विशेषत: दलित आणि मुस्लिमांच्या हत्या केल्या जात आहेत. 2015 साली दादरी येथे मोहमंद अखलाख यांच्या घरात घुसून त्यांची हत्या करण्यात आली, 2016 मध्ये गुजरातेत उना येथे मृत गाईचे कातडे सोलल्याचा बहाण्याने सहा दलित युवकांना बेदम मारहाण करण्यात आली, 2017 साली अल्वर येथे पेहलू खान याची 200 जणांच्या जमावाने हत्या केली आणि अगदी काही दिवसांपूर्वी 20 जून रोजी उत्तर प्रदेशातील मिरत येथे कासिम यांची हत्या करण्यात आली. अशा असंख्य घटना देशात घडल्या आहेत. 2010 सालानंतर झालेल्या 63 हल्ल्यांपैकी बहुसंख्य हल्ले 2014 साली मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर झाले आहेत. या सर्व घटना घडत आहेत कारण हत्याऱ्यांना माहित आहे की सरकारचे त्यांना समर्थन आहे. गोरक्षकांकडून होणाऱ्या हत्यांबद्दल मगरीचे अश्रू ढाळणाऱ्या मोदी सरकारचा खरा चेहरा पुन्हा एकदा तेव्हा समोर आला जेव्हा मोदी सरकारमधील विमान उड्डयण मंत्री जयंत सिन्हा यांनी नुकतेच, 2017 साली झारखंड मध्ये अलिमुद्दीन अन्सारी यांची हत्या करण्याबद्दल शिक्षा झालेल्या, 7 खुन्यांचे लाडू खाऊ घालून कौतुक केले.*

# जर कोणी मालकच नसेल तर कामगाराला काम कोण देईल?

## काही साधी-सोपी समाजवादी तथ्य

✍ पॉल लफार्ग

*द सोशलिस्ट, सप्टेंबर 1903 मध्ये प्रकाशित*

*आपल्या आसपासच्या लोकांकडून विचारला जाणारा हा प्रश्न तुमच्या कानावर नेहमीच पडत असेल किंवा हा प्रश्न तुम्हाला देखील पडला असेल. चला तर मग, या प्रश्नाचे उत्तर समजून घेऊयात. अनुवाद करताना पैशाचे चलन आणि समप्रमाणात आकडे बदलण्यात आले आहेत.*

**कामगार:** जर कोणी मालकच नसेल तर मला काम कोण देईल?

**समाजवादी:** हा प्रश्न मला नेहमीच विचारला जातो. चल याचे उत्तर शोधूयात. मला सांग काम करण्यासाठी तीन वस्तूंची गरज पडते ना? कारखाना, मशीन ,आणि कच्चा माल.

**कामगार:** हो बरोबर.

समाजवादी: मग कारखाना कोण बनवतो?

**कामगार:** मिस्त्री.

समाजवादी: मशीन कोण बनवतात?

**कामगार:** इंजिनीयर.

**समाजवादी:** कपडे तयार करण्यासाठी तुम्हाला लागणारा कापूस कोण उगवतो, मेंढराची लोकर कोण काढतो? ज्याचा वापर करून तुझी बायको चरख्यावर धागा तयार करते. तुझा मुलगा हे खनिज भट्टीत भरतोय ते खनिज खाणीतून कोण काढतो?

**कामगार:** शेतकरी, धनगर, आणि खाणीत काम करणारे माझ्यासारखे कामगार.

**समाजवादी:** अगदी बरोबर.... तु, तुझा मुलगा आणि तुझी बायको यामुळेच काम करू शकता कारण अन्य कामगार, शेतकरी तुम्हाला कारखाना, मशीन, आणि कच्चामाल पुरवण्यासाठी मेहनत करत असतात.

**कामगार:** पण हे देखील लक्षात घेतले पाहिजे की, मी कापूस आणि चरख्याशिवाय कपडा विणू शकत नाही.

**समाजवादी:** म्हणजेच तुला काम भांडवलदार किंवा मालक देत नाही तर मिस्त्री, इंजिनीयर, शेतकरी हे देतात. तुला माहित आहे का की, तुझ्या मालकाने अशा कामासाठी लागणाऱ्या अन्य वस्तू कशा मिळवल्या?

**कामगार:** त्याने या वस्तू विकत घेतल्या.

**समाजवादी:** त्यासाठी लागणारे पैसे कोणी दिले?

**कामगार:** मला काय माहित? आज तो करोडपती आहे. कदाचित त्याच्या बापाने त्याच्यासाठी काही पैसे कमावून ठेवले असतील.

**समाजवादी:** त्याने हे करोडो रुपये स्वतः मशीन वर कपडे विणून कमवले का?

**कामगार:** त्याने स्वतः तर नाही. आमच्याकडून काम करवून कमावले हे मात्र नक्की.

**समाजवादी:** म्हणजेच तो कष्ट न करताच श्रीमंत झाला. नशीब आजमावण्याचा हा एकमात्र उपाय आहे. जे काम करतात त्यांना मात्र पोटापाण्यापुरतेच काही ते मिळते. मग मला सांग तू आणि तुझे सहकारी कामगारांनी जर काम नाही केले तर तुझ्या मालकाच्या मशीनिंना गंज नाही का लागणार? त्याचा कापूस किडे मुंग्या खाऊन नाही का टाकणार?

**कामगार:** आम्ही जर काम नाही केले तर कारखान्यातील सर्व वस्तू गंजून जातील आणि शेवटी त्या भंगारात जातील.

**समाजवादी:** बरोबर, तुम्ही काम करून उलट त्याच्या मशीनची आणि कच्च्या मालाचे रक्षण करत आहात.

**कामगार:** अरेच्चा, मी याबद्दल कधीच विचार केला नव्हता.

**समाजवादी:** बरं मला सांग, तुझा मालक कधी कारखान्यात होत असलेल्या कामाची देखभाल करतो का?

**कामगार:** जास्त नाही, तो कारखान्यात मात्र रोज येतो. परंतु आपले हात खराब होण्याच्या भीतीने खिशात ठेवतो. कारखान्यातच दुसऱ्या विभागांमध्ये माझी बायको आणि मुलगा काम करतात तिथे तो कधीच येत नाही. हो, पण तिथेच चार मालक आहेत. पण ते देखील कधीच दिसत नाहीत. मालक कोण आहेत हेसुद्धा कळत नाही. एवढेच काय, तर कारखान्यातील तीन-चतुर्थांश कामगारांनी मालकाची सावलीसुद्धा बघितलेली नाहीये. असं समजा की तुम्ही आणि मी बचत करून पन्नास हजार जमा करतो आणि एका भागाची(शेअर) खरेदी करून कार्यस्थळावर पाऊल न ठेवतात मालकांमधील एक बनतो.

**समाजवादी:** कारखान्यात कधी मालक येत नाही, भागधारक येत नाही, तर मग तुमच्याकडून काम करवून घेण्याचे आणि लक्ष ठेवण्याचे काम कोण करतो? मालक येत नसल्यामुळे कामाच्या ठिकाणी तर तुम्हाला भरपूर स्वातंत्र्य मिळते. याचा कामावर काही परिणाम होत नाही का?

**कामगार:** कसलं डोंबलाचं स्वातंत्र्य, मॅनेजर आणि फोरमन असतात की आमच्याकडून काम करून घेण्यासाठी.

**समाजवादी:** मग जर कारखाना उभा करण्यापासून ते मालाचे उत्पादन करण्यापर्यंत कामगार, शेतकरी हे सगळं काही करतात. तुमच्याकडून मॅनेजर आणि फोरमन काम करवून घेतात तर मग मालक काय करतो?

**कामगार:** काहीच नाही. बस आमच्या कष्टावर मजा मारण्याचं काम करतो.

**समाजवादी:** अरे, जर इथून चंद्रापर्यंत ट्रेन गेली असती तर आपण मालकांना बिना रिटर्न तिकिटाचे चंद्रावर पाठवून दिले असते आणि तुझे कपडे विणणे, तुझ्या बायकोचं चरख्याचं काम, तुझ्या मुलाचं साच्याचं काम यावर यामुळे काही एक फरक पडला नसता, ते चालूच राहिलं असतं. असो, तुला माहित आहे का की, मागच्या वर्षी तुझ्या मालकाला किती नफा झाला ते?

**कामगार:** आम्ही तो मोजला आहे. साधारण एका कोटीच्या आसपास रुपये त्याला मिळाले असतील.

**समाजवादी:** त्याने पुरुष-महिला तरुण यांना धरून एकूण किती लोकांना रोजगार दिला आहे?

**कामगार:** शंभर.

**समाजवादी:** त्यांना किती पगार मिळतो?

**कामगार:** मॅनेजर आणि फोरमनचा पगार धरून सरासरी वर्षाला 1 लाख रुपये

**समाजवादी:** म्हणजे शंभर कामगारांना एकूण पगाराच्या स्वरूपात वर्षाला 1 कोटी रुपये मिळतात. जे फक्त एवढेच आहेत की तुम्ही उपाशी मेले नाही पाहिजे. आणि तुमचा मालक मात्र एकटाच एक कोटीपर्यंत आपल्या खिशात घालतो. हे दोन कोटी रुपये येतात कुठून?

**कामगार:** हे पैसे आभाळातून तर पडत नाहीत हे मात्र नक्की आणि तसंही मी कधी रुपयाचाचा पाऊस पडलेला देखील कधी बघितला नाही.

**समाजवादी:** तुम्हाला जे पगाराच्या स्वरूपात एक कोटी रुपये मिळालेत आणि जे मालकाच्या खिशात फायदा म्हणून एक कोटीरुपये गेलेत हे सगळे पैसे कामगारांनीच निर्माण केलेत. तुझा मालक याच फायद्याचा वापर नवीन मशिनरी खरेदी करण्यासाठी करतो आणि तुझ्यासारख्याच अन्य कामगारांना रोजगार देतो. या पद्धतीने तो सतत नफा कमावत राहतो.

**कामगार:** हे नाकारता येणार नाही.

**समाजवादी:** या पद्धतीने कामगारच ते पैसे निर्माण करतो जे मालक त्यांना काम करण्यासाठी लागणाऱ्या मशीन खरेदी करण्यासाठी वापरतो. तुमच्याकडून काम करून घेणारे मॅनेजर आणि फोरमन हे देखील तुमच्या सारखेच वेतन घेणारे गुलाम असतात. मग इथे मालकाचे काय काम? तो कोणत्या कामासाठी चांगला आहे?

**कामगार:** श्रमाच्या शोषणासाठी

**समाजवादी:** आपण म्हणू शकतो की, 'श्रमिकांना लुटण्यासाठी' असं म्हणणं जास्त स्पष्ट आणि योग्य असेल.

*अनुवाद : नागेश धुर्वे*

# महाराष्ट्रात आणि देशात जातीय अत्याचार चालूच कामगारांनी जातीय अत्याचारांविरोधात एल्गार पुकारला पाहिजे.

✍ बबन ठोके

जातीव्यवस्था आणि जातिगत अन्याय अत्याचार आपल्या समाजावरील एक घाणेरडा डाग आहे आणि हा डाग दिवसेंदिवस जास्तच दुर्गंधी पसरवत आहे. गेल्या 10 जूनला जळगाव येथील जामनेर तालुक्यात वाकडी गावांमध्ये दोन मातंग तरुणांना विहिरीत पोहल्याच्या कारणावरून फक्त बेदम मारलेच नाही, तर नागडे करून गावामध्ये फिरवत शेतात घेऊन गेले व व्हिडिओ बनवून व्हाट्सअप वर प्रसारित देखील करण्यात आला. या अगोदर मे महिन्यात लातूर जिल्ह्यातील रुद्रवाडी गावातील एका मातंग नवविवाहित जोडप्याला मारुतीच्या मंदिरात प्रवेशाच्या निमित्ताने मारहाण करण्यात आली होती व नंतर त्यांच्यासोबत गावातील सर्वच मातंग कुटुंबांचा बहिष्कार करण्यात आला होता. सार्वजनिक विहिरीतील पिण्याच्या पाण्यापासून ते किराणा दुकान व पिठाची गिरणी अशा दैनंदिन जीवनातील सर्वच बाबी बंद करण्यात आल्या. यातील बरीच कुटुंब ही मजुरी करण्यासाठी गावातील उच्च जातीतील लोकांवर अवलंबून होती. विशेष म्हणजे गावाची सरपंच देखील एक मातंग महिलाच आहेत. सरपंचा सहित सर्वांवरीलच सामाजिक व आर्थिक बहिष्काराने त्यांना गाव सोडण्यासाठी मजबूर केले.

अशाप्रकारे विविध जातीय कष्टकरी दलितांवर अत्याचाराच्या घटना गेल्या काही वर्षांमध्ये मोठया संख्येने झाल्या आहेत. 2014 मधील पुण्यातील माणिक उंडगेचा खून, 2015 साली नगरमध्ये सागर शेजवळ या तरुणाची आंबेडकरांविषयीचा रिंगटोन ठेवल्यामुळे हत्या, 2014चे जवखेडा येथील हत्याकांड, 2014 मधीलच नितीन आगे हत्याकांड या घटना लोकांच्या मनात अजूनही ताज्या आहेत. जातीय अत्याचारांच्या अशा मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना फक्त महाराष्ट्रातच नाही तर पूर्ण देशामध्ये दररोज समोर येत आहेत. आत्ताच 25 मे ला तमिळनाडूमधील कयनाघम गावांमध्ये तीन दलितांच्या हत्या करण्यात आल्या व सोबतच कित्येक लोकांना जखमी करण्यात आले. या दलितांचा दोष फक्त एवढाच होता की हे आर्थिक बाबींमध्ये गावातील उच्चजातीय लोकांवर अवलंबून नव्हते, काही जणांनी तर चांगल्या नोकऱ्या देखील मिळवल्या होत्या. त्यामुळे उच्चजातीयांच्या अहंकाराला धक्का बसला आणि त्यांनी हल्ला केला. गुजरातमध्ये अहमदाबाद पासून 110 किलोमीटर दूर एका गावात तेरा वर्षाच्या दलित मुलाला यासाठी मारहाण करण्यात आली की त्याने चांगले कपडे घातले होते. मारणाऱ्या उच्चजातीय तरुणांचे म्हणणे होते की तो उच्चजातीय लोकांसारखा दिसण्याचा प्रयत्न करतो म्हणून अशांना धडा शिकवणे गरजेचे होते.

आत्ताच्या काही घटनां सोबत मागील काही दशकांतील घटनांचा अभ्यास केल्यावर लक्षात येते की, या सर्व घटनातील आरोपी हे सर्वाधिक ओबीसी/शेतकरी जमीनदार जातींमधील आहेत. गावातील दलित समुदायांपैकी बहुसंख्य वरच्या शेतकरी जातींकडे मजूरी करायला जातात. जेव्हा दलित आपली मजुरी वाढवण्याची मागणी करतात तेव्हा अशा प्रकारच्या घटना आपल्यासमोर येतात. काही ठिकाणी दलितांमधील एक हिस्सा शहरात छोट्या-मोठ्या नोकऱ्या करत पूर्वीपेक्षा चांगल्या स्थितीत आलेला आहे. तेथे उच्च जातीतील लोक यासाठी त्यांच्यावर अन्याय अत्याचार करतात की हे दलित आमच्यासमोर डोके वर करून जगण्याची हिंमत कशी करू लागले आहेत. याचे एक उदाहरण हरियाणात मिर्चपूर ची घटना आहे. या ठिकाणी एका ताराचंद नामक दलित वृद्ध व्यक्तीला त्यांच्या अपंग मुली सहित 2010 मध्ये जिवंत जाळण्यात आले होते.

आज आपला देश असंख्य जातीमध्ये विभागाला गेला आहे. प्रत्येक जातीकडे आपल्यापेक्षा खाली पाहण्यासाठी कोणतीतरी जात आहेच. देशात जातीवर आधारित असंख्य संघटना आहेत. सतत दलितांवरील हिंसेचे प्रकार सुरूच आहेत. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अहवालानुसार देशात प्रत्येक दिवसाला तीन दलित महिलांवर बलात्कार होत आहे व दोन दलितांची हत्या केली जात आहे. उच्च शिक्षण संस्थांमध्ये दलित विद्यार्थ्यांसोबत केला जाणारा जातिगत भेदभाव किती आहे हे यावरून समजून येते की 2007 पासून उत्तर भारत व हैद्राबाद विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांच्या 25 आत्महत्यांपैकी 23 दलित विद्यार्थ्यांच्या आहेत.

स्वातंत्र्या नंतर सत्तेत आलेल्या काळ्या इंग्रजांनी जातीचा वापर प्रत्येक वेळेस जनतेतील असंतोषाला दाबण्यासाठी केला आहे. 1990 च्या दशकात जेव्हा उदारीकरण व खाजगीकरणाच्या माध्यमातून देशातील लोकांपासून बरेच काही हिसकावून घेण्यात येत होते तेव्हा मंडल कमिशनच्या राजकारणाच्या माध्यमातून जनतेला जातीजातींमध्ये गोलबंद करण्यात आले. आज सुद्धा जेव्हा आर्थिक संकट भीषण झालेले आहे व सरकारी नोकऱ्या संपण्याच्या मार्गावर आहेत, तेव्हा मराठा, जाट, गुज्जर, पटेल यांना जातीच्या आधारावर संघटित करून शासक वर्ग आपला डाव खेळत आहे. महाराष्ट्रामध्ये मागील दोन-तीन वर्षांत जातीच्या आधारे जे मोर्चे निघाले त्यांचा भयंकर परिणाम येणाऱ्या काळात सर्वसामान्य जनतेला भोगावा लागतील.

तसं तर सर्वच सरकारं जातीय भेदभावाचा फायदा उचलून जनतेला एकमेकात लढविण्याचे काम करतात जेणेकरून लोकांनी आपल्या हक्क अधिकारासाठी जागृत होऊन आवाज उठवला नाही पाहिजे, पण यामध्ये भाजपा सर्वात पुढे आहे. भाजपला नियंत्रित करणारी आर.एस.एस.

पान 7 वर

# केवळ आसाराम नाही तर संपूर्ण धर्माची लुटारू वृत्ती ओळखा

✍ लखविन्दर

*25 एप्रिल 2018 रोजी आसाराम बापूला बलात्काराच्या आरोपाखाली शिक्षा झाली. केस चालू असताना त्याच्या निर्दोषत्वाच्या समर्थनात अनेक हिंदुत्ववादी संघटनांनी आंदोलन आणि प्रचार केला होता. पण आसाराम विरुद्धची केस आणि पुरावे इतके मजबूत होते की प्रचंड राजकीय दबाव असूनही त्याला शिक्षा ठोठावावी लागली. गेल्या काही वर्षांमध्ये अशाप्रकारच्या बलात्कारी, गुन्हेगार, फसवेबाज बाबा-मातांचा पूरच आला आहे. अनेक उदाहरणे तर डोळ्यासमोरच आहेत. राधे-मा विरोधात पोलिस तक्रारी होऊनही कारवाई करण्यात टाळाटाळ करण्यात आली. सचिन दत्ता उर्फ सचिदानंद गिरी उर्फ बिल्डर बाबाला 2015 मध्ये घरांचय संदर्भात बँक लोनचा घोटाळा केल्याची केस दाखल झाली. गुरमित सिंह उर्फ बाबा राम-रहिमला 25 ऑगस्ट 2017 रोजी बलात्काराच्या आरोपाखाली शिक्षा झाली तेव्हा तर त्याच्या भक्तांनी दंगलच घडवली. विवेकानंद झा उर्फ स्वामी ओझा विरोधात चोरी पासून ताडा पर्यंत खटले दाखल आहेत. श्रीमुर्ती द्विवेदी उर्फ इच्छाधारी भिमानंद बाबाला 2010 साली सेक्स रॅकेट चालवण्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झाला. नोव्हेंबर 2014 मध्ये हरियाणातील बाबा रामपालला खुन्याच्या खटल्यामध्ये कोर्टात हजर होत नाही म्हणून अटक करण्यासाठी पोलिस गेले तेव्हा त्याच्या किल्ल्यावजा आश्रमातून त्याच्या भक्तांनी मशिन-गन्स घेऊन युद्धच पुकारले. अलिकडे जून-2018 महिन्यात दाती महाराजावर बलात्काराचा आरोप होऊनही त्याला अटक झालेली नाही. अशा बाबा-मातांची यादी कितीही मोठी होऊ शकेल. खालील लेख आसाराम बापूला अटक झाल्यानंतर 2013 साली लिहिला गेला होता, आणि धर्माच्या नावाने लुटारू वृत्तीकडे, आसाराम बापू सारख्यांच्या राजकीय-आर्थिक संबंधांकडे तो लक्ष्य वेधतो आणि आजही अत्यंत प्रासंगिक आहे. त्यामुळे या लेखाचा मराठी अनुवाद प्रकाशित करत आहोत.- संपादकीय टिपण*

---

आपण एक संत आहोत; असा दावा करून आपल्या भक्तांनी आपल्यावर जी श्रद्धा प्रकट केली आहे, तिचा गैरफायदा आसारामकडून उठवला गेला. आपल्या भक्तिणींवर बलात्कार करून त्यांना धमकावून गप्प करण्यात आले. यामधून भक्तांकडून अमाप संपत्ती (10,000 कोटी) गोळा करण्यात आली. अशी व्यक्ती संत असू शकत नाही, असेही या निमित्ताने म्हटले जात आहे. परंतु असे करताना एकंदरीत धर्म आणि संत यांच्या चारित्र्यावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्रत्यक्षात एका बाजूला धर्म व साधुसंत, आणि दुसऱ्या बाजूला शोषणकारी भांडवलदारी अर्थव्यवस्था व राजकारण हे पूर्णपणे एकमेकात मिसळून गेलेले आहेत. ह्या लुटारू गटबंधनाला आपण नीटपणे ओळखले पाहिजे.

सर्वसामान्य लोकांमध्ये आज प्रचंड प्रमाणात सामाजिक आर्थिक असुरक्षा आहे. या व्यवस्थेबाबत तात्विक आणि वैज्ञानिक दृष्टीकोन नसल्यामुळे देव, भूतबाधा, जादूटोणा, पूजापाठ यावर लोकांचा विश्वास आहे. विविध धर्मांमध्ये याबाबत विविध रीती-रिवाज आहेत. **शोषक वर्ग नेहमी जनतेच्या धार्मिक विश्वासांचा गैरफायदा उठवून त्यांचे आर्थिक-सामाजिक-राजकीय शोषण करीत आलेले आहेत. धर्म ही वास्तवात पारलौकिक गौष्ट नसून नेहमी लौकिक म्हणजे या जगाशी संबंधित अशीच आहे.** शोषक वर्ग हा नेहमी आपल्या सशस्त्र ताकदीच्या जोरावर राज्य करतो. सध्याच्या भांडवलदारी व्यवस्थेपूर्वी गुलामगिरीच्या काळात गुलाम आणि त्यांचे मालक, सरंजामशाहीच्या काळात राजे-राजवाडे हे धार्मिक विचारांचा आधार घेऊन राज्य करीत होते. राजा हा विष्णूचा अंश आहे, अशा प्रकारचे विचार वर्णव्यवस्थेत पसरवले जात. त्यामुळे संपूर्ण जनता त्यांची गुलामगिरी पत्करायला सहजपणे तयार होत असे. हेच या शोषणकारी व्यवस्थेचे दैवतीकरण होते. परंतु आज भांडवलदारी व्यवस्थेमध्ये अशी परिस्थिती नाहीये. या व्यवस्थेचे दैवतीकरण झालेले नाहीये. मात्र आजही धर्म हा भांडवलदारी वर्गाच्या हातात राज्य करण्याचे महत्त्वाचे हत्यार आहे.

**साधू, संत, पाद्री, मौलवी यांचा वापर नेहमीच शोषक वर्ग करीत आलेला आहे. यांच्या बदल्यात भांडवलदारी लुटीचा एक हिस्सा या धार्मिक गटाला मिळत आहे.** जसजशी सामाजिक-आर्थिक-राजकीय परिस्थिती बदलते तसा धर्मातही बदल होत जातो. आज भांडवलदारी व्यवस्था कायम झाल्यासारखी दिसतेय आणि त्यामुळे धर्माचे रूपांतरही बाजारी व्यवस्थेत झालेले आहे. स्वतःला “देवदूत” किंवा “परमेश्वराचे रूप” मानणारे हे बाबा, संत हे स्वतःच भांडवलदार झालेले आहेत. ते खरे म्हणजे दलाल, भांडवलदार प्रथम आहेत आणि साधूसंत नंतर आहेत.

**नफा हे प्रत्येक भांडवलदाराचे एकमेव उद्दिष्ट असते. मग ते कोणत्याही प्रकारे, कितीही अमानवीय पद्धत वापरावी लागली तरी, भांडवलदार जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात. हे भांडवलदार आपले उत्पादन विकण्यासाठी जनतेतले अज्ञान, त्यांच्यातल्या विविध अंधश्रद्धा यांचा फायदा उठवून जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात.** धर्माला राजकारणाशी जोडून हे काम ते अधिक चांगल्या प्रकारे करतात. धर्म आणि भांडवल यांचे हे एकत्रीकरण त्यांच्या अमाप नफ्याचा स्त्रोत आहे. म्हणूनच आपल्या देशामध्ये संत आणि भांडवलदार मोठ्या संख्येने एकमेकांच्या बरोबर आहेत.

निवडणूक लढविणारे सर्व भांडवलदारी पक्ष या साधुसंतांचे भक्त असतात. या संतांच्या भक्तांचे रूपांतर हे पक्ष आपल्या मतपेढीमध्ये करू इच्छित असतात. संत आपले भांडवल आणि सामाजिक आधार यांच्या मदतीने चांगल्यापैकी राजकीय स्थान स्वतःसाठी मिळवतात. संतांचा धर्माच्या नावावर उभा असलेला कारोबार आणि भांडवलदारी राजकारण हे अशा रीतीने एकमेकांना पूरक आहे. हे संत आपले गुन्हे, गैरव्यवहार लपविण्यासाठी याच राजकारण्यांचा आधार घेतात.

आसाराम हा भांडवलदारी संतांपैकी एक आहे. त्याची एकूण संपत्ती 10,000 कोटी रु. आहे. “संत आसाराम बापू ट्रस्ट” या नावाच्या संस्थेचे एकंदर 425 आश्रम आहेत. यातील काही परदेशात सुद्धा आहेत. औषधे, रुग्णालये, शाळा, पुस्तके, मासिके यातून नफा तर येतोच. शिवाय भक्तांनी दिलेल्या देणग्या वेगळ्याच. श्री. श्री. रविशंकर, गुरमीत राम रहीम, बाबा रामदेव यांच्या सारख्या भांडवलदारी संतांची संख्या भारतात बरीच आहे. सन 2011 मध्ये बाबा रामदेव हे 1100 कोटी रु. चे मालक होते. देशाच्या उत्तराखंड या राज्यात 250 चौ. मीटरपेक्षा जास्त जमीन राज्याच्या बाहेरची व्यक्ती खरेदी करू शकत नाही. त्या ठिकाणी रामदेव 2000 एकरचे मालक आहेत, आमच्या या स्वदेशी बाबाने अमेरिकेतील ह्यूस्टन येथे 100 एकर जमीन व स्कॉटलंड मध्येही बरीचशी जमीन खरेदी केली आहे. भांडवलदारी धर्म हा किती नफेखोर धंदा आहे, हे आपण बघताय.

आसाराम यांची बरीचशी मालमत्ता सरकारने अनुदानाच्या रूपाने दिलेल्या जमिनीवर उभी आहे. या जमिनीबरोबरच सरकारी-बिगरसरकारी जमिनींवर अतिक्रमण करूनही त्या ताब्यात त्यांनी घेतल्या आहेत. गुजरात सरकारच्या म्हणण्यानुसार आसारामच्या आश्रमांनी 67,099 एकर जमिनीवर कब्जा केलेला होता. अशाच प्रकारचे आरोप त्याच्यावर मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थान मध्येसुद्धा झाले आहेत. 2010 साली जेव्हा आसारामच्या मठामध्ये चार मुलांचा रहस्यमय मृत्यू झाला होता, तेव्हा आपल्या अशाच राजकीय संबंधांमधून आसाराम तुरुंगांत जाता जाता वाचला होता. याबाबत गुजरात सरकारने अत्यंत नाईलाजाने या प्रकरणाची जी चौकशी त्यावेळेला केली होती, ती आजतागायत लोकांसमोर आलेली नाही. गुजरातमध्ये भाजपाची सत्ता असेल, नाहीतर धर्मनिरपेक्ष काँग्रेसची, आसाराम हा अघोषित राजगुरु होता. खास करून भाजपच्या नेतृत्वाखालची राज्य सरकारे आसाराम सारख्या बाबांना अगदी उघडपणे साथ देत होती, आणि त्याची मदतही घेत होती. हा सरळसरळ देवाणघेवाणीचा प्रकार होता. उमा भारती जेव्हा मध्यप्रदेशची मुख्यमंत्री होत्या, तेव्हा आसारामचे विधानसभेत प्रवचन ठेवण्यात आले होते. भाजपचे आडवाणी आणि काँग्रेसचे दिग्विजयसिंह सारख्या मोठ्या नेत्यांचे आसारामचे फार जुने संबंध होते. मात्र आता एका अल्पवयीन मुलीवरच्या बलात्काराचे प्रकरण घडले तेव्हा मात्र हे सर्व भक्तगण बाजूला झाले आहेत. अर्थात आसारामला वाचवण्याचे आतून भरपूर प्रयत्न झालेच. यावेळेला आसारामच्या विरोधात पुरावा एवढा भक्कम होता की, भांडवलदार वर्गातील अंतर्गत झगडे, या प्रकरणांचा टीआरपी वाढविण्यासाठी मिडीयामध्ये झालेली जबरदस्त स्पर्धा, समाजाच्या लोकशाहीवादी -परिवर्तनवादी विभागाकडून आसारामच्या विरोधात उठलेला आवाज इत्यादी कारणांमुळे आसारामला तुरुंगात जावे लागले. देशातील भांडवलदारी न्यायव्यवस्थेला अखेर याही गोष्टींचा विचार करावा लागला. यामुळे दुसऱ्या बुवांना जरा सावधगिरीने वागण्याचा धडा मिळेल. यापेक्षा अधिक काही फरक पडणार नाही.

इतर साधूंच्या राजकीय लागेबांध्याची उदारणेही बघावी लागतील. श्री. श्री. रविशंकरच्या आर्ट ऑफ लिव्हिंगच्या मुख्यालयासाठी कर्नाटक सरकारने 99 वर्षाच्या कराराने जमीन दिली आहे. ओडिसा सरकारनेही या संस्थेला 200 एकर जमीन अनुदान या स्वरूपात दिली आहे. या जमिनीवर मागच्या वर्षी प्राचीन मूल्ययुक्त आधुनिक शिक्षणाचे एक विद्यापीठ सुरू करण्यात आले. मध्यप्रदेशामध्ये महर्षी महेश योगी या साधूला एका विश्वविद्यालयासाठी जमीन देण्यात आली. बाबा रामदेवलाही विविध सरकारांनी स्वस्तात जमीन दिली आहे. त्यात महाराष्ट्राचाही समावेश आहे.

नवउदारीकरण, खाजगीकरणाच्या या जमान्यात सरकार जनतेची मालमत्ता आणि विविध स्त्रोत देशी-विदेशी भांडवलदारांच्या ताब्यात देत आहे. खासगी-सार्वजनिक भागीदारीच्या नावावर जनतेचे पैसे आणि मालमत्ता या भांडवलदारांच्या तिजोरीत भरले जात आहेत. या सरकारी धोरणाचा हे साधू भांडवलदार भरपूर फायदा उठवीत आहेत.

**हे साधू अतिशय सनातनी, परिवर्तनविरोधी, जनताविरोधी आणि फॅसिस्ट (भांडवलदारी हुकूमशाहीवादी) शक्तींचा एक भाग आहेत.** आसारामने आपला पहिला आश्रम 1970 मध्ये गुजरातच्या अहमदाबादमध्ये सुरू केला. परंतु त्याला 1980 नंतरच प्रसिद्धी मिळाली. याच काळात भारतात उदारमतवादी आर्थिक धोरणे सुरू झाली होती. उदारमतवाद याचा अर्थ भांडवलदार वर्गावरची सर्व कायदेशीर व आर्थिक बंधने हळूहळू काढून टाकून मुक्त अर्थव्यवस्थेला उत्तेजन देणे. याच काळात कडव्या हिंदुत्ववादाच्या जोरदार प्रचाराला भाजपाच्या लालकृष्ण आडवाणी यांच्या नेतृत्वाखाली सुरवात झाली होती. आसारामचा उदय हा सुद्धा कडव्या हिंदुत्ववादाच्या उदयाचा एक भाग आहे. आसाराम हा आत्मसुधाराच्या प्रवचनांच्या नावाखाली कडवा हिंदुत्ववाद आणि रूढीप्रिय संस्कृती यांचा प्रचार करीत असे. स्त्री स्वातंत्र्याला त्याचा प्रखर विरोध आहे. ख्रिश्चन आणि मुसलमान यांच्या विरोधात हिन्दु जनमानसात विष कालवायचे आणि लोकांना हिंसक कारवाईला तयार करायचे हा अशा संस्थांचा एक विशेष भाग होता. आसारामवर बलात्काराचा आरोप ठेवल्यानंतर विश्व हिंदू परिषदेच्या अशोक सिंघल यांनी एक पत्रकार परिषद घेऊन मत्याच्यावर बलात्काराचा आरोप लावणे हा हिंदू संस्कृतीवर हल्ला आहे.फ असे उद्गार काढले होते. केवढा हा बलात्कारी साधूची बाजू घेण्याचा भयंकर हिंदुत्ववादी प्रयत्न!

हे अतिशय रुढीवादी साधू कष्टकरी जनतेचे कट्टर शत्रू आहेत. कष्टकरी जनतेने भांडवलदारी व्यवस्थेच्या विरोधात क्रांतीकारी एकजूट करावी, अशी त्यांची कधीच इच्छा नसते.

**धर्माच्या नावाने हे साधू लोकांना आत्मसुधाराची प्रवचने देतात; परंतु ही प्रवचने ते स्वतःला लागू करत नाहीत.** इतर भांडवलदारांप्रमाणे हे भांडवलदारी संतही नफ्याच्या मागे असतात आणि भक्तांची लूट करून बांडगुळासारखे ऐशोरामात राहतात. जनतेच्या दुःखाला कष्टकऱ्यांची भांडवलदार वर्गाकडून होणारी लूट जबाबदार आहे, हे ते आपल्या प्रवचनातून कधीही सांगत नाहीत. परंतु त्यांच्या दुःखाला मागच्या जन्मात त्यांनी केलेले पाप जबाबदार आहे, असे खोटेच सांगतात. सत्य काय आहे, ते सांगून ते समस्त भांडवलदारी वर्गाच्या विरुद्ध जाऊ इच्छित नाहीत. जनतेला अंधश्रद्ध करून ही व्यवस्था टिकविण्याचाच प्रयत्न ते करतात. **धर्म हा नेहमीच शोषकांची सेवा करीत आला आहे. आज तो भांडवलदार वर्गाची सेवा करीत आहे.**

*अनुवाद : डॉ. सुरेश बेरी*

स्वातंत्र्य सैनिक आणि क्रांतिकारक शहिदांच्या नजरेतून रा.स्व.संघांची काळी कृत्ये

# “भयानक कट”

✍ सुरेंद्र कुमार
(नौसेना विद्रोहात भाग घेतलेले स्वातंत्र्य सैनिक)

***रा.स्व.सेवक संघाने देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात कधीच भाग घेतला नाही. त्याच काळात संघाचे लोक देशातील लोकांना धर्माच्या नावाखाली आपापसात लढवण्यामध्ये गुंतले होते. इथे एका लेखाचा अंश सदर करत आहोत, जो सांगतो की जेव्हा सगळा देश इंग्रजांविरोधात स्वातंत्र्य मिळवण्यासाठी रस्त्यावर उतरून लढत होता, त्याच काळात 1946-47 च्या दरम्यान संघ आपल्याच देशातील लोकांच्या विरोधात कट कारस्थाने रचण्यात गुंतला होता. गुजरात दंगलींच्या काळात संघाच्या लोकांनी कसे मुसलमानांच्या घरांना आणि दुकानांना वेचून वेचून नष्ट केले त्याची पाळेमुळे या लेखात सापडतात. मग लक्षात येते की या सगळ्या कट कारस्थानांच्या मागे किती तयारी केली गेली होती. हिटलरच्या जर्मनीमधील नाझींनी ज्यू लोकांच्या कत्तली करण्यासाठी वापरलेल्या पद्धतींचा वापर कसा करायचा याची कला संघाने आत्मसात केली होती. या लेखाचा हा भाग प्रसिद्ध पत्रकार आणि नौसेना विद्रोहात भाग घेतलेले स्वातंत्र्य सैनिक सुरेंद्र कुमार यांनी “दायित्वबोध पत्रिके” साठी प्रस्तुत केला होता.***

इकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा अधिक क्रूर चेहरा प्रकाशात आला आहे, ज्याच्याबद्दल श्री. राजेश्वर दयाल (आय.सी.एस., आता दिवंगत) यांनी आपल्या पुस्तकात “अ लाइफ ऑफ अवर टाइम” (ओरिएंट लॉंगमॅन 1998 पा.क्र. 93-94) मध्ये लिहिले आहे. ते 1946-47 दरम्यान उत्तर प्रदेश चे गृहसचिव होते, त्या काळातील अनुभव मांडत आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या मानवद्वेषी संस्थेने पश्चिमी उत्तरप्रदेशमधील मुस्लीम रहिवासी असलेल्या भागातील रस्ते, गल्ल्या अगदी घरांपर्यंतचे नकाशे तयार केले होते, अतिशय पद्धतशीरपणे जनसंहार करण्याचे षडयंत्र रचण्यात आले होते, हे सगळे काम सरसंघचालक एम.एस. गोळवलकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले होते. हा सगळा अनुभव राजेश्वर दयाल यांच्या शब्दांमध्ये...

“उत्तर प्रदेशच्या मंत्रिमंडळाच्या टाळाटाळ आणि निर्णय न घेण्याचे भयंकर परिणाम झाले, याबद्दलचा मी अतिशय गंभीर स्वरूपाचा वृत्तांत सांगत आहे.”

"सांप्रदायिक तणावाचा उन्माद अतिशय जोरदारपणे आकार घेत होता, त्याच काळात वेस्टर्न रेंजचे डेप्युटी इंस्पेक्टर बी. बी. एल. जेटली जे अतिशय मुरलेले-मुत्सद्दी आणि सुयोग्य पोलीस अधिकारी होते, ते अत्यंत गुप्तपणे माझ्या घरी आले. त्यांच्यासोबत आणखी दोन पोलीस अधिकारी आले होते, त्यांच्याकडे कुलुपबंद दोन मोठ्या ट्रंका होत्या. जेंव्हा त्या ट्रंका उघडल्या गेल्या, तेव्हा राज्यातल्या पश्चिमी जिल्ह्यांमध्ये सांप्रदायिक आधारावर नरसंहार करण्याचा कट समोर आला. त्या ट्रंका जेव्हा उघडल्या तेव्हा त्या प्रांतातील सर्व पश्चिमी जिल्ह्यांमधील प्रत्येक शहर, गावांचे नकाशे समोर आले, ज्यात चूक होण्याची कोणतीही शक्यता नव्हती. ते सर्व नकाशे पद्धतशीरपणे तयार करण्यात आले होते. त्या नकाशांवर मुस्लीम बहुल वस्त्या, गल्ल्या आणि मुसलमान लोकांच्या विभागांवर मोठमोठ्या खुणा करण्यात आल्या होत्या. या सर्व वेगवेगळ्या खुणा केलेल्या ठिकाणी कसे पोहचावे या आणि अशा प्रत्येक बारीक सारीक गोष्टींचे निर्देश करणारे दस्तावेज तयार करण्यात आले होते. हे सर्व त्यांच्या महाअनर्थकारी उद्देशावर प्रकाश टाकत होते.”

“या भयंकर रहस्याचा भेद झाल्यानंतर मी सर्व पोलिसांना घेऊन सरळ प्रधानमंत्र्यांच्या (त्यावेळी मुख्यमंत्र्यांना प्रधानमंत्री म्हटले जायचे) स्थानी गेलो. तिथेच एक बंदिस्त खोलीमध्ये जेटली यांनी आपल्या संपूर्ण तपासाचा अहवाल सादर केला, ज्याचे सगळे पुरावे त्या ट्रंकमध्ये उपलब्ध होते. संघाच्या अड्ड्यावर योग्यवेळी छापे मारल्यामुळे एका भयंकर षडयंत्राचा भांडाफोड झाला होता. हा सगळा कट संघाच्या प्रमुखांच्या आदेशाखाली आणि देखरेखीखाली सामंजस्याने तयार केला गेला होता. जेटली आणि मी, आम्ही दोघांनी गोळवलकरांच्या ताबडतोब अटकेवर जोर दिला.”

“पंतजींना (गोविंद वल्लभ), त्यांच्या समोर असलेल्या पुराव्यांचा स्वीकार करण्याशिवाय गत्यंतर नव्हते. पण प्रमुख आरोपीला अटक करण्याचा निर्णय घेण्याबद्दल, ज्या निर्णयाची आम्ही प्रतीक्षा करत होतो आणि रफी अहमद किदवाई (गृहमंत्री) यांनी जो निर्णय नक्की घेतला असता, पंतजीनी सर्व मामला मंत्री मंडळाच्या पुढील बैठकीत विचारविनिमयासाठी नेण्यात यावा असा निर्णय घेतला. नक्कीच हा सगळा मामला राजकीय दृष्टीने अत्यंत नाजूक होता, कारण संघाची पाळेमुळे देशात सर्वत्र पसरलेली होती. या शिवाय राजकीयदृष्ट्या त्यांचे हात दगडाखाली होते कारण संघाचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष दोन्ही प्रकारचे सहानुभूतीदार कांग्रेस पार्टीमध्ये आणि मंत्रिमंडळामध्ये होते. विधान परिषदेचे अध्यक्ष आत्मगोविंद खेर स्वत: राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडलेले होते. तसेच त्यांचा मुलगा स्वत: संघाचा प्रत्यक्ष सदस्य होता ही बाब सर्वांनाच माहित होती.”

“मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये नेहमीप्रमाणे टाळाटाळ होत राहिली आणि अप्रासंगिक गोष्टींची चर्चा होत राहिली. पोलिसांनी एका अशा कटाचा पर्दाफाश केला होता जो कट संपूर्ण विभागाला आगीत टाकू शकला असता. संबंधित अधिकाऱ्यांची प्रशंसा होणे अपेक्षित होते, पण या तथ्यावर या सगळ्या चर्चांमध्ये काहीच बोलले गेले नाही. सगळ्या चर्चांच्या अंती असे ठरवले गेले की गोळवलकरांच्या नावे एक पत्र पाठवण्यात यावे, या पत्रात त्यांच्या विरुद्ध समोर आलेले पुरावे आणि त्यांचे गंभीर स्वरूप याबद्दल त्यांना सांगण्यात यावे आणि त्यांच्याकडून याबाबत स्पष्टीकरण मागवण्यात यावे. असे पत्र तयार केल्यानंतर त्याचे वजन वाढावे म्हणून ते प्रधानमंत्र्यांच्या नावाने पाठवले जावे यावर मी भर दिला. पंतजीनी मला या पत्राचा मसुदा तयार करण्यास सांगितले. त्यांच्या लिखाण शैलीची नक्कल करत ते पत्र मी तयार करून दिले. हे पत्र ताबडतोबीने पाठवणे अपेक्षित होते. हे काम दोन पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात आले पण त्याचवेळी गोळवलकर यांना आधीच सावधान करण्यात आले होते. त्या इलाक्यात त्यांचा ठावठिकाणाच नव्हता. शोधता शोधता असे समजले की ते दक्षिणेकडे निघून गेले आहेत. तिकडे त्यांचा पाठलाग करणाऱ्यांच्या चकवण्यात ते यशस्वी झाले होते. ठिकठिकाणी त्यांचा शोध घेतला जात होता, ज्याला कुठलेही यश मिळत नव्हते आणि अनेक आठवडे या सगळ्यात निघून गेले.”

“मग आला 1948 चा 30 जानेवारीचा दिवस, ज्यादिवशी शांतीचा सर्वोच्च दूत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका मतांधाच्या गोळीचा शिकार झाला. या संपूर्ण त्रासदायक प्रकरणाचा मला उबग येऊ लागला.”

*अनुवाद : तृप्ती*

# कविता : कामगार बंधो!

**नामदेव ढसाळांचे नाव मराठी क्रांतिकारी आंदोलनाच्या अग्रणी कवींमध्ये आहे. दलित पँथर नंतरचे त्यांचे राजकीय जीवन चढ-उतारांनी भरलेले होते आणि शेवटी ते ज्या राजकारणासोबत गेले तो एका स्वतंत्र वादाचा मुद्दा आहे. परंतु त्यांच्या त्या बंडखोर काळातील एक क्रांतिकारक कविता आपल्यासमोर सादर करत आहोत.**

✍ *नामदेव ढसाळ*


हे जग तुझ्या श्रमावर चालले आहे
किती रे करतोस रक्ताचे पाणी
मी तुलाच सर्जनाचा निर्माता मानतो
बाकीच्यांचा हिशोब कशाला?

एकतृतीयांश जगावर रक्ताने रंगलेला ध्वज फडकावणारा तूच
ह्या देशाच्या रक्तधमनीतून वाहणाराही तूच
लोखंड वितळवणारा आणि आकार देणाराही तूच
जिथे जिथे यंत्राचा वावर झाला त्या शहरांना
क्रांतिकारक वारसा देणाराही तूच
तुझे घामेजलेले स्नायू चित्र मी माझ्या
कवितेत प्रतिमेसाठी वापरतो.
माझ्या कवितेला सप्राण करतो.
मला माहिताहे की तूच लढू शकतोस गुलामगिरीविरुद्ध
मला माहित आहे की तूच पर्दाफाश करू शकतो सरंजामशाहीचा
मला माहित आहे की तूच मूठमाती देऊ शकतो भांडवलशाहीला
मला माहित आहे की तूच वितरणासाठी वापरू शकतो शासनयंत्रणा
तुझा मी स्तुतिपाठक भाट

त्यांच्या लेखी मी देशद्रोही आणि गुन्हेगार
ते वल्गना करत आहेत माझ्या घरा वरून नांगर फिरवण्याची

कामगार बंधो!
ज्या हिटलरचं तू थडगं बांधलंस
त्या थडग्याचाच ह्या कुल्यांना विसर पडलाय

*'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले'या कविता संग्रहा मधून*



# देश श्रीमंतांच्या टॅक्सच्या पैशांवर चालतो का? नाही!

*नितेश शुक्ला*

अनेकदा उच्च मध्यम वर्ग किंवा उच्च वर्गाकडून असे म्हटले जाते की देश त्यांच्या पैशाने चालतो, तेच लोक सरकारला टॅक्स देतात, ज्यातून सगळी कामं होतात, आणि गरिब लोक तर फक्त सबसिडी, मोफत सुविधांच्या रुपात त्यांच्या टॅक्सच्या पैशांना उडवतात. याच प्रकारे गरिब सामान्य लोक देशावरचे ओझंच असतात. खरेतर हे एक प्रकारचे धादांत खोटं आहे जे व्यापक रुपात लोकांमध्ये पसरलेले आहे. **जर आकड्यांच्या हिशोबात पाहिले तर गोष्ट याच्या ठीक उलट आहे. सरकार जो टॅक्स वसूल करते, त्याचा मोठा हिस्सा याच गरिब सामान्य जनतेच्या खिशातून येतो. बघूयात कसे ते.**

सामान्यत: उच्च मध्यमवर्गाचा तर्क हा असतो की टॅक्स अडीच लाख रुपये उत्पन्नाच्या वरील व्यक्तींवरच लागतो, त्यामुळेच फक्त तेच लोक टॅक्स देतात ज्यांचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा जास्त आहे. पण ज्या टॅक्सची ते गोष्ट करत आहेत तो आहे उत्पन्नावरचा कर (उत्पन्नकर, आयकर, किंवा इन्कम टॅक्स) आहे. **आयकर हा सरकारच्या उत्पन्नाचा एकमात्र स्रोत नाही. तुम्हाला हे जाणून आश्चर्य होईल की आयकरातून सरकारला फारच कमी उत्पन्न मिळते.** सरकार दोन प्रकारे टॅक्स वसूल करत असते:

1. प्रत्यक्ष कर
2. अप्रत्यक्ष कर

प्रत्यक्ष करामध्ये आयकर आणि कॉर्पोरेशन टॅक्स (कंपनी कर) येतात आणि अप्रत्यक्ष करांमध्ये सेल्स टॅक्स, सर्विस टॅक्स, राज्यांचा वॅट टॅक्स (या सर्वांना एकत्र करून आता वस्तू आणि सेवा कर, जीएसटी बनवण्यात आला आहे), कस्टम ड्युटी, एक्साईज ड्युटी, रोड टॅक्स, मनोरंजन कर, स्टॅंप ड्युटी, इत्यादी कर येतात.

सरकारला या सर्व करांमधून उत्पन्न मिळते, ज्यामधून सरकार आपले बजेट बनवते. **दरवर्षीच्या कर वसूलीच्या आकड्यांकडे पाहिल्यावर मध्यम आणि उच्च वर्गामध्ये पसरलेली ही चुकीची धारणा धराशाही होते की देश त्यांच्या टॅक्सच्या पैशांनी चालतो.**

आर्थिक वर्ष 2017-18 मध्ये एकूण कर वसूली 19,46,119 कोटी रुपये होती. यामध्ये कॉर्पोरेशन कर 5,63,744 कोटी रुपये होता आणि आयकर 4,41,255 कोटी रुपये होता. जर एकूण बजेटच्या प्रमाणात पाहिले तर आयकराची वसूली एकून बजेटच्या फक्त 22 टक्के होती. हे तेच 22 टक्के आहेत ज्यांच्या आधारावर मध्यमवर्ग आणि उच्च वर्गीय लोक असा विचार करतात की तेच देश चालवत आहेत आणि बाकी लोक तर ओझं आहेत. दुसरीकडे पाहिले तर याच दरम्यान अप्रत्यक्ष करांमधून 9,41,119 कोटी रुपये उत्पन्न मिळाले होते, ज्यामधून सरकारला 2017-18 मध्ये एकूण राजस्वाच्या 48 टक्के उत्पन्न झाले होते.

हे पूर्ण चित्र नाही. खरेतर वर ज्या कॉर्पोरेशन कराबद्दल (जो एकूण राजस्वाच्या 29 टक्के आहे) उल्लेखले आहे, तो सुद्धा जनतेलाच द्यावा लागतो. **कॉर्पोरेशन टॅक्स एखाद्या कंपनीच्या एकूण नफ्यावर लागणारा कर आहे. भारतामध्ये हा 30 टक्क्यांच्या दराने लागतो आणि यावर सरचार्ज आणि सेस सुद्धा लागू होतात. कंपनी एक व्यक्ती नाही, त्यामुळे कंपनीद्वारे चुकवला जाणारा कर वास्तवात कोणाद्वारे चुकवला जातो? वास्तवात हा कर सुद्धा त्या ग्राहकांनाच द्यावा लागतो, जे उत्पादन खरेदी करतात.** माल निर्माण होणाच्या प्रक्रियेमध्ये त्याच्या मूल्यामध्ये वृद्धी श्रमाद्वारे निर्माण होते, श्रम-जे देशातील कोट्यवधी मजूर-कर्मचारी करतात. या किमतीमध्ये झालेल्या वृद्धीचा खुप छोटा हिस्सा मजुरांना मजुरीच्या रुपात मिळतो, बाकी वेगवेगळ्या स्तरावर फॅक्टरी मालक, ठोक विक्रेते, किरकोळ विक्रेत्यांमध्ये नफ्याच्या रुपात वाटला जातो. अशाप्रकारे नफ्यावर दिला जाणारा कर सुद्धा खरेतर मजुरांद्वारे निर्माण केलेल्या मूल्यावर मिळवलेल्या नफ्यातूनच येतो. सोबतच नफा वसूली (प्रॉफिट रिअलायझेशन) उत्पादन विकण्याच्या प्रक्रियेमध्येच होत असते. जर कोणी 100 रुपयांचे सामान विकत घेतले, ज्याला बनवण्यासाठी मजूरी सोबत गुंतवणूक 60 रुपये आहे आणि बाकी 40 रुपये वेगवेगळ्या स्तरांवर नफ्याच्या रुपात वाटले गेले आहेत तर त्या नफ्यावर वेगवेगळ्या स्तरांवर दिला गेलेला टॅक्स ग्राहकांद्वारे सामानाच्या बदल्यामध्ये दिल्या गेलेल्या पैशांमधूनच (रु. 100) दिला गेला जातो. कारण नफा हा मूल्य वृद्धी (व्हॅल्यू ॲडीशन) आणि माल विक्री (व्हॅल्यू) रिअलायझेशनच्या चक्रीय प्रक्रियेमध्येच निर्माण होतो, आणि फॅक्टरी मालक, ठोक विक्रेता, किरकोळ विक्रेता वगैरे या प्रक्रियेमध्ये फक्त माध्यमाच्या रुपातच काम करतात. जर माल निर्माण झाला पण ग्राहकाने विकत घेतला नाही तर त्यावर काहीच नफा होणार नाही, त्यामुळे नफ्यावर कर देण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. अशाप्रकारे कॉर्पोरेशन कर अप्रत्यक्ष रुपाने सामान्य जनतेकडूनच वसूल केला जातो. जर यालाही जनतेकडून दिल्या जाणाऱ्या अप्रत्यक्ष करांशी जोडले तर सामान्य जनताच एकूण राजस्वाचा 78 टक्के भाग देत असते.

काही लोक म्हणू शकतात की अप्रत्यक्ष कर सुद्धा मध्यमवर्ग आणि उच्च वर्गाद्वारेच तर दिला जातो. हे खरे आहे की अप्रत्यक्ष कर त्या सर्वांनाच द्यावा लागतो जे सामान खरेदी करतात, सेवांचा उपभोग घेतात. परंतु जर आपण भारतात आयकर देणाऱ्या करदात्यांची संख्या पाहिली, तर दिसते की भारतात आयकर देणारा वर्ग खुपच छोटा आहे. 2015-16 मध्ये फक्त 1.7 टक्के लोक आयकर देत होते. यामुळेच निम्न मध्यमवर्ग आणि निम्नवर्गापेक्षा जास्त खर्च करूनही या एकून 1.7 टक्के लोकसंख्येकडून अप्रत्यक्ष करांचे योगदान बरेच कमी आहे. अशाप्रकारे हे पाहू शकतो की देशामध्ये एक भिकारी सुद्धा टॅक्स देतो. आता **अजून एक प्रश्न विचारला जाऊ शकतो की शेवटी एक व्यक्ती किंवा परिवार सरासरी किती कर देतो?**

**या प्रश्नाचे उत्तर सुद्धा बरेच आश्चर्यचकीत करणारे आहे. हे एक असे सत्य आहे ज्यावर नेहमीच पडदा टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.** जर तुम्ही आयकर देत असाल तर तुम्हाला माहित असते की तुम्ही वर्षभरामध्ये किती टॅक्स दिला; पण तुम्ही हे जाणण्याचा प्रयत्न करत असाल की तुम्ही वर्षभरामध्ये किती अप्रत्यक्ष कर दिला तर हे बऱ्यापैकी अवघड आहे. आपणे इथे हे जाणण्याचा प्रयत्न करूयात की एखादी व्यक्ती किती अप्रत्यक्ष कर देते. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्री (फिक्की) द्वारे 2007 मधील एका अभ्यासानुसार एखाद्या उत्पादनाच्या किमतीत सरासरी 35 टक्के टॅक्स असतो. त्यानंतर आजपर्यंत अनेकदा टॅक्स वाढवला गेला आहे आणि अनेक तथाकथित टॅक्स सुधार झाले आहेत. आज पेट्रोल उत्पादनांवर 100 टक्के पेक्षा जास्त टॅक्स आहे, बाकी सामानांवरही पहिलेच्या तुलनेत टॅक्स बराच वाढवला गेला आहे, त्यामुळेच हा 35 टक्केचा आकडा आज 40 ते 45 टक्के पर्यंत पोहोचला आहे. ढोबळमानाने मोजण्यासाठी जर आपण आजच्या संदर्भामध्ये खर्चावर सरासरी 30 टक्के कराचा दर मानला (कारण काही खर्च टॅक्स मर्यादेच्या बाहेर आहे आणि काही वर टॅक्स कमी आहे) तरी सुद्धा चकीत करणारे चित्र समोर येते.

समजा एक व्यक्तीचे उत्पन्न वर्षाला 5 लाख रुपये आहे, ज्यापैकी तो 4 लाख परिवाराच्या पालनपोषणावर खर्च करतो आणि बाकी पैशांची थोडी बचत करतो. त्याला किती आयकर द्यावा लागेल? अडीच लाखाच्या वरील उत्पन्नाच्या 5 टक्के म्हणजे 12,500 रुपये. आता पाहूयात की त्याने अप्रत्यक्ष कर किती दिला. जर 4 लाख रुपयांच्या सामान आणि सेवांवर खर्च केला असेल तर 30 टक्के च्या हिशोबाने जवळपास 1,20,000 रुपये अप्रत्यक्ष करांच्या रुपाने द्यावे लागतात. **दरवर्षी बजेट आल्यावर लोक हे शोधतात की आयकराचे दर कमी झालेत की नाहीत, जेव्हा सर्वात मोठा बोजा तर अप्रत्यक्ष करांचा असतो.**

एक व्यक्ती जिचे उत्पन्न अडीच लाख रुपयांपर्यंत आहे, तिला आयकर द्यावा लागत नाही. पण तिला जवळपास 75,000 रुपये अप्रत्यक्ष कर द्यावा लागतो. या देशामध्ये एक मजूर परिवार ज्यामध्ये दोन लोक 10,000 रुपयांची मजुरी करतात आणि वर्षाला 2,40,000 रुपये कमावतात आणि ज्यांना त्यापैकी पूर्ण रक्कम खर्चावी लागते, ते सुद्धा 72,000 रुपये टॅक्सच्या रुपात सरकारला देतात. ही गोष्ट स्पष्ट आहे की अप्रत्यक्ष कर प्रत्यक्ष करांपेक्षा जास्त चिंताजनक आहेत. याचे एक कारण अजूनही आहे. अप्रत्यक्ष करांचा दर सर्वांसाठी समान आहे, ज्यामुळे एक मजूरही त्याच दराने टॅक्स देतो ज्या दराने त्याचा अब्जाधीश मालक देतो. हे समजण्यासाठी एक उदाहरण घेऊ शकतो. एका मजूर परिवाराचे उत्पन्न जर वर्षाला अडीच लाख आहे आणि खर्च 2 लाख आहे, तर तो जवळपास 60,000 रुपये अप्रत्यक्ष कर देतो. तेच जर एखाद्या मालकाचे उत्पन्न 1 कोटी रुपये आहे आणि खर्च 30 लाख रुपये आहे (उत्पन्न वाढत गेल्यावर बचतीचा हिस्साही वाढत जातो) तर त्या हिशोबाने त्याला 9 लाख रुपये अप्रत्यक्ष कर द्यावा लागतो. दिसायला हे खूप जास्त आहे; पण दोन्ही स्थितींची तुलना केली तर मजूर परिवार एकूण उत्पन्नाच्या 24 टक्के अप्रत्यक्ष कर देतो जेव्हाकी मालक आपल्या एकूण उत्पन्नाच्या 9 टक्के अप्रत्यक्ष कर देतो. इथे प्रत्यक्ष कराला सुद्धा जोडून पाहिले जाऊ शकते, पण त्यामध्ये डावपेचांना बराच वाव आहे. आपले उत्पन्न कमी दाखवणे, खोटे डोनेशन्स, कर्ज दाखवणे, इत्यादी माध्यमांचा व्यापक वापर करून मालक आपल्या उत्पन्नाचा बराच भाग लपवतात. यामुळेच भारतात उत्पन्न कर भरणाऱ्यांची संख्या इतकी कमी आहे. खरेतर मालक या क्लुप्त्या वापरुन 10-15 टक्क्यांच्या आसपासच कर भरतात. याला वरील आकड्यामध्ये जोडले तरी मालक आपल्या उत्पन्नाच्या 20-25 टक्केच टॅक्स देतात. अशाप्रकारे एका मजुराच्या आणि एका अब्जोपतीला आपल्या उत्पन्नाच्या जवळपास सारखाच हिस्सा कराच्या रुपात भरावा लागतो, जेव्हा की मजूर परिवाराचे उत्पन्न बरेच कमी असते. स्पष्ट आहे की ही कर प्रणाली सामान्य जनता/मजुरांसाठी अतिशय अन्यायपूर्ण आहे.

वरील आकड्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होते की देशाच्या एकूण राजस्वाच्या जवळपास 80 टक्के सामान्य जनतेच्या खिशातूनच येतो. अशामध्ये उच्च मध्यम वर्ग आणि उच्च वर्गाचा हा दंभ की देश तेच लोक चालवत आहेत - एकदम निराधार आणि मूर्खतापूर्ण आहे. या देशातील कोट्यवधी सामान्य कष्टकरी जनतेच्या जोरावर हा देश चालतो. त्यांच्या मेहनतीच्या जोरावर आणि त्यांच्याच पैशाच्या जोरावरही. वास्तवात हे मालक लोकच आहेत जे देशावर ओझं आहेत, जे स्वत: सुद्धा पैदा करत नाहीत आणि सामान्य जनतेच्या मेहनतीला लुटून अंधाधूंद संपत्तीवर कब्जा करतात.

*अनुवाद: अभिजित*




*भांडवलशाहीत सर्वच सरकारं ही भांडवलदारांचीच सरकारं असतात. पण मोदी सरकार तर अगदी नागडेपणानं अडानी-अंबानी सारख्या उद्योगपतींचेच सरकार आहे. मोदी सरकारने अंबानींच्या अस्तित्वातच नसलेल्या जिओ विद्यापीठाला भारतातील सर्वोत्तम शिक्षणसंस्थेचा दर्जा जाहीर केला आहे. यावरुन देशभरात गदारोळ उठूनसुद्धा या निर्णयाचे निर्लज्ज समर्थन मोदी सरकारने केले आहे. दुसरीकडे झारखंड मध्ये अडानींच्या वीज कंपनीसाठी आदिवासींच्या जमिनी हिसकावून घेतल्या आहेत. मोदी सरकारचे 'देशप्रेम' इतके मोठे आहे की भारतातील जनतेचे दमन करून लावलेल्या या प्रकल्पासाठी खुद्द झारखंड मध्ये असलेला कोळसा न वापरता कोळसा ऑस्ट्रेलियातून आणला जाईल आणि निर्माण झालेली वीज झारखंडमधील जनतेला न देता, सगळी वीज बांग्लादेशला विकली जाईल. शिवा अडानीने हा प्रकल्प उभे करण्याचे कंत्राट सेप्को-थ्री या चिनी कंपनीला दिलेले आहे. कॉर्पोरेट कंपन्यांचे पाय चाटणारे मोदी सरकार - हीच आहे संघी भाजपाईंची 'देशभक्ती'!*

• संपादक मंडळ – सोमनाथ केंजळे, सत्यनारायण • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 104, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 9156323976, 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखला, मुंबई - 9820017588 कडून मुद्रित